# चिन्हच नसल्याने अपक्षांना भर निवडणुकीत घरात बसण्याची आली वेळ ?

दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे | अंक –७९ | सोमवार दि.२४ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-79 | Monday, Dt.24 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# आज आंबेडकरी समाज घड्याळाची टिकटिक बंद करणार, का अजित दादा चमत्काराचा गजर बीडमध्ये वाजवणार ?

**बीड / वैभव स्वामी**

**बीड नगराध्यक्ष पदासाठी अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मुस्लिम मतांवर डोळा ठेवून शेख मुजीब यांच्या सासूला उमेदवारी दिली. तर एम आय एम पक्षाने देखील याचाच कित्ता गिरवत इनामदार यांच्या पत्नीला उमेदवारी दिली. आम आदमी पार्टीने देखील असाच उमेदवार नगराध्यक्ष पदासाठी लादला आहे. हा प्रकार अनुसूचित जातीवर अन्याय करणारा असून घटना बाह्य आहे. म्हणून आंबेडकरी समाजाने एकत्रित येऊन याविरुद्ध रणशिंग फुंकले आहे. आज आंबेडकरी समाज राष्ट्रवादीच्या घड्याळाची टिकटिक निवडणुकीत बंद करण्यासाठी एकत्रित वज्रमुठ बांधणार आहे. तर दुसरीकडे बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला निर्माण झालेल्या अडचणीतून बाहेर काढत या पक्षाला आणि पक्षाच्या उमेदवारांना ताकद देण्यासाठी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री आज बीडमध्ये येऊन चमत्काराची गजर वाजवतील का ? याकडे आता लक्ष वेधले आहे.**

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष पदाचा उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गातील थेट न देता मुस्लिम समाजाच्या मतांवर डोळा ठेवून अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीडमध्ये राजकीय केंद्र सध्या शिवछत्र झाले आहे. याच शिवछत्र मधून आमदार विजयसिंह पंडित यांनी आरपीआयचे नेते पप्पू कागदे यांना स्वतःहून संपर्क साधत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आपण नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी घ्यावी यासाठी गळ घातली. पप्पू कागदे यांनी आपले आरपीआयचे नेते मंत्री खासदार रामदास आठवले यांना विश्वासात घेऊन घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. मात्र आंबेडकरी चळवळीतील स्वाभिमानी, स्वबळावर नेतृत्व करण्याची धमक पप्पू कागदे या युवा नेतृत्वामध्ये असल्यामुळे भविष्यात जर ते नगराध्यक्ष झाले तर आपल्या राजकीय अडचणी वाढतील कदाचित असा हेतू समोर ठेवून पंडित यांनी पप्पू कागदे यांची उमेदवारी ऐनवेळी रद्द करून ही उमेदवारी संपादक असलेले शेख मुजीब यांच्या पत्नीला कायदेशीर अडचणी ऐनवेळी निर्माण झाल्यामुळे उमेदवारी न देता त्यांच्या सासूला उमेदवारी दिली असा थेट आरोप आरपीआयचे युवा नेते पप्पू कागदे यांनी स्वतः पत्रकार परिषदेत केला. याचवेळी ते म्हणाले, अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जो उमेदवार लादला आहे तो उमेदवार बीड तहसील येथे शासकीय सेवेत असताना दोन वेळा भ्रष्टाचाराच्या प्रकरणात अडकलेला होता. त्याचबरोबर या उमेदवाराला कोणतीही सामाजिक, राजकीय भूमिका आणि नगरपालिकेचे प्रशासन चालवण्याची धमक नाही. या उमेदवाराच्या अडून बीड नगरपालिकेला भ्रष्टाचाराचे कुरण करण्यासाठी राष्ट्रवादीने उमेदवारी दिली आहे असा थेट आरोप करत पप्पू कागदे यांनी बीड नगरपालिकेसह बीड जिल्ह्यातील अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या एकाही उमेदवाराला घडी या चिन्हावर आंबेडकरी समाजाने मतदान करू नये असे खुले आवाहन केल्यानंतर बीड सह महाराष्ट्रात खळबळ उडाली होती. या भूमिकेवर आज पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली सर्व आंबेडकरी समाज एकत्रित येऊन निर्णय घेणार आहे.या बैठकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घड्याळ या चिन्हावर मतदान करायचे नाही यावर ठाम निर्धार जाहीर होण्याची शक्यता आहे. म्हणजेच आंबेडकरी समाज बीड जिल्ह्यात अजितदादांच्या घड्याळाची टिकटिक बंद करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेत आहे.याचे परिणाम पंडितांसह अजित दादांच्या राष्ट्रवादीला सोसावे लागणार यात शंका नाही.

तर दुसरीकडे या भूमिकेमुळे बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि या पक्षाचे घडी हे चिन्ह घेऊन उभे असलेले उमेदवार संकटात सापडले आहेत. या उमेदवारांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी अडचणीत आलेल्या पक्षाला उभारी देण्यासाठी दस्तूर खुद्द पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार हे आज बीड जिल्ह्यामध्ये येत असून बीडमध्ये ते व्यापारी आणि बीडच्या सर्व जनतेशी थेट संवाद साधणार आहेत. या संवादातून ते आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घडीची गजर वाजवण्यामध्ये सक्षम होतात का ? विस्कटलेली घडी पुन्हा बसवण्यात यशस्वी होतात का ?याकडे आता बीड सह राज्याचे लक्ष वेधणार आहे.

## राष्ट्रवादीत आज कोणाचे प्रवेश होतात याकडे अनेकांचे लक्ष

अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये दादांच्या उपस्थितीत बीडसह जिल्ह्यामध्ये कोणा कोणाचे प्रवेश होतात याकडे आता सर्वच पक्षांचे लक्ष लागले आहे. हे प्रवेश येणाऱ्या निवडणुकीत निश्चितच परिणाम करणारे ठरतील हे नक्की.




## आंबेडकरी समाजापुढे अपक्ष उमेदवार दिव्या स्वामी योग्य पर्याय ?



उच्चशिक्षित तरुण अपक्ष उमेदवार म्हणून दिव्या महेश स्वामी नगराध्यक्ष पदासाठी नशीब आजमावत आहेत. अतिशय सामान्य कुटुंबातील या तरुणीने निवडणूक लढवण्याचे धाडस दाखवले आहे. कोणत्याही राजकीय पक्षात नसलेली अपक्ष उमेदवार असलेली दिव्या महेश स्वामी या स्वच्छ प्रतिमेच्या उच्चशिक्षित उमेदवाराला जर आंबेडकरी समाजाने आपला उमेदवार म्हणून स्वीकारले त्यावर शिकामोर्तब केले तर एक आदर्श घडेल आणि बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत आंबेडकरी परिवर्तन घडेल अशी चर्चा होत आहे.

## चिन्हच नसल्याने अपक्षांना भर निवडणुकीत घरात बसण्याची आली वेळ ?

बीड ।प्रतिनिधी

निवडणूक आयोगाच्या अडमुठे पणाचा फटका अपक्ष उमेदवारांना मोठ्या प्रमाणात बसला आहे. २१ तारखेला उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. यानंतर २५ तारखेपर्यंत उमेदवारांना निवडणूक चिन्ह अधिकृतरित्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून देण्यात येणार नाही. २६ तारखेला निवडणूक चिन्हाचे वाटप होणार आहे.ज्या राजकीय पक्षांना चिन्ह आहे ते उमेदवार मतदारांपर्यंत आपले चिन्ह घेऊन जात आहेत. मात्र जे अपक्ष उमेदवार आहेत त्यांना मतदारांच्या दारात गेल्यानंतर आपले चिन्ह काय आहे ? असे विचारल्यावर तोंड बंद ठेवण्याची वेळ येत असल्यामुळे अपक्ष उमेदवारांना भर निवडणुकीत प्रचार न करता चिन्ह नसल्यामुळे घरात बसण्याची वेळ आली आहे. निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत नगरपालिकांच्या निवडणुका जाहीर केल्या. अवघ्या एक महिन्याच्या आत निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. यामुळे निवडणुकीला उभ्या राहिलेल्या उमेदवारांची पूर्ती दम छान झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी केवळ सात दिवसाचा अवधी होता. इतक्या कमी कालावधीमध्ये उमेदवार नेमका कोण उभा करायचा ? त्या उमेदवारांची लागणारी कागदपत्रे गोळा करता करता इच्छुक उमेदवारांच्या तोंडाला फेस आला होता. या धावपळीमध्ये अनेक उमेदवारांचे अर्ज अर्धवट फॉर्म भरल्यामुळे अथवा अपूर्ण कागदपत्र दाखल केल्यामुळे अपात्र ठरले. तर दुसरीकडे निवडणूक आयोगाच्या नियमानुसार २१ तारखेला उमेदवारी अर्ज घेण्याची शेवटची मुदत होती. ज्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतले त्यांचा विषय संपला.मात्र ज्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले नाहीत त्या उमेदवारांना त्याच दिवशी म्हणजे २१ तारखेला जर चिन्ह वाटप केले असते तर अपक्षा सहित सर्वच राजकीय पक्षांना आपले चिन्ह निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृतरित्या घेऊन मतदारांपर्यंत जाणे सोपे झाले असते. मात्र निवडणूक आयोगाच्या आडमुठेपणामुळे उमेदवारांना चिन्ह वाटप २६ तारखेला करण्यात येणार आहे. उमेदवारांचे नाहक पाच दिवस चिन्ह नसल्यामुळे वाया गेले आहेत. आधीच प्रचाराचा कालावधी अवघ्या ११ दिवसाचा आहे त्यात पाच दिवस गेल्यानंतर केवळ ६ दिवस निवडणुकीत उमेदवारांना आपले चिन्ह घेऊन मतदारांपर्यंत जाण्यासाठी राहतो. इतक्या कमी कालावधीमध्ये उमेदवारांना मतदारांपर्यंत आपले चिन्ह आणि नाव घेऊन जाणे अशक्य आहे. जे उमेदवार राजकीय पक्षांचे उमेदवार आहेत त्यांना एक वेळेस इतका अल्प कालावधी देखील पुरेसा होऊ शकतो. मात्र जे उमेदवार अपक्ष आहेत त्यांना आपले चिन्ह सामान्य मतदारांपर्यंत घेऊन जाणे अशक्य आहे. याचाच अर्थ निवडणूक आयोगाने अपक्ष उमेदवारांनी भविष्यात निवडणूकच लढू नये असे नियोजन केले आहे का ? असा संताप अपक्ष उमेदवारांमधून व्यक्त होत आहे.

## माजी मंत्री प्रा. सुरेश नवले राष्ट्रवादीत आल्यास बीडसह जिल्हाचे चित्र बदलणार

बीड ।प्रतिनिधी

शिवसेनेचे नेते, अभ्यासू माजी मंत्री प्रा. सुरेश नवले सध्या शिंदे यांच्या शिवसेनेत अस्वस्थ आहेत. ते अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याचे समजते.जर माजी मंत्री प्रा सुरेश नवले यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उपमुख्यमंत्री अजितदादांनी सन्मानाने संधी दिली तर बीड नगरपालिकेसह जिल्ह्यातील नगरपालिकेत सकारात्मक परिणाम होईल याशिवाय राज्यात देखील अजितदादांची बाजू भक्कम होण्याची शक्यता ना करता येणार नाही.



प्रा सुरेश नवले यांचे अभ्यासू राजकीय विश्लेषक भाषण सर्वसामान्य जनतेला मनातून पटते.त्यांचे विचार सामान्य मतदारांच्या मनाला भिडतात. त्यामुळे नवले हे सामान्य जनतेला आपले वाटतात. ते आपल्या विचारातून समाजाचे परिवर्तन करू शकतात. ही ताकद त्यांच्या शब्दात असल्यामुळे अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने त्यांना पक्षप्रवेश देऊन जर बीड जिल्ह्यासह राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात प्रचाराची जबाबदारी दिली तर त्या ठिकाणी परिवर्तन घडवून आणण्याची ताकद माजी मंत्री प्रा सुरेश नवले यांच्या वाणीमध्ये आहे. ते अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा जोरात आहेत मात्र अद्याप त्यांचा प्रवेश प्रत्यक्षात झाला नाही. बीड विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधानसभा अध्यक्ष डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी ऐनवेळी अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला रामराम करून भाजपाचे कमळ हातात घेतले आहे. त्यांना शह देण्यासाठी माजी मंत्री प्रा सुरेश नवले निश्चितच एक प्रमुख शस्त्र म्हणून या निवडणुकीत परिवर्तन घडू शकतील. ही ताकद त्यांच्या शब्दांच्या शस्त्रामध्ये आहे. इतकेच नव्हे तर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसह पक्ष वाढीसाठी माजी मंत्री प्रा सुरेश नवले एक आश्वासक चेहरा म्हणून राष्ट्रवादीला केवळ एका विधानसभा पुरता मर्यादित न राहता राज्यस्तरावरील अभ्यासू चेहरा मिळू शकतो.यावर अजितदादांनी आज बीड जिल्ह्यामध्ये आल्यानंतर अधिकृत घोषणा करून नवलेंच्या प्रवेशाबाबत चर्चेला पूर्णविराम देऊन पक्ष वाढीसाठी धोरणात्मक निर्णय जाहीर करतील का ? अशी चर्चा होत आहे.

## ना. अजितदादांचा आजचा व्यापारी मेळावा आणि जाहीर सभा राष्ट्रवादीच्या विजयाची नांदी ठरणार : शेख निजाम

बीड ।प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत आज दि. २४ नोव्हेंबर रोजी बीडमध्ये व्यापारी मेळावा आणि जाहीर सभा होत आहे. दादांच्या उपस्थितीत होणारा मेळावा आणि जाहीर सभा राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयाची नांदी ठरणार आहे असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख निजाम यांनी व्यक्त केला आहे. अजितदादांच्या उपस्थितीत आज होणाऱ्या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहनही त्यांनी केले आहे.



बीड नगरपालिका निवडणुक राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम मित्र पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलताताई पारवे यांच्यासह शहरातील २६ प्रभागांमधील ५२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. अजितदादा पवार आज सोमवार दि. २४ नोव्हेंबर रोजी बीड दौऱ्यावर येत आहेत. अजित दादांच्या उपस्थितीत आज सायंकाळी ६ वाजता माँ.वैष्णव पॅलेस येथे व्यापारी मेळावा आणि सायंकाळी ७ वाजता सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसरात जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या व्यापारी मेळावा आणि जाहीर सभेच्या माध्यमातून जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून अजितदादा बीड शहराच्या विकास आराखडा संकल्प जनतेसमोर मांडणार आहेत. बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि बारामती सारखा विकास करण्याच्या दृष्टीने अजितदादांची ही सभा महत्त्वाची ठरणार आहे. दादांच्या उपस्थितीत होणारा मेळावा आणि जाहीर सभा बीड मधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलाताई पारवे आणि ५२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या विजयाची नांदी ठरणार आहे. या सभेला बीड शहरातील सर्व व्यापारी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख निजाम यांनी केले आहे.


## राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आज बीडमध्ये

### व्यापारी मेळावा आणि जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार हे आज दि. २४ नोव्हेंबर रोजी बीडमध्ये येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम मित्र पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रेमलताताई पारवे आणि सर्व २६ प्रभागातील ५२ उमेदवारांच्या प्रचारार्थ व्यापारी मेळावा आणि जाहीर सभेला ना. अजितदादा पवार संबोधित करणार आहेत.

बीड नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ मधील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम मित्र पक्षाच्या नगराध्यक्ष उमेदवार प्रेमलताताई पारवे यांच्यासह ५२ नगरसेवकांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री , बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार हे आज सोमवारी बीडमध्ये येत आहेत. बीड शहरातील माँ वैष्णव मंगल कार्यालय येथे आज सायंकाळी ५ वाजता ना. अजितदादांच्या उपस्थितीत व्यापारी मेळावा आणि सायंकाळी ७ वाजता सिद्धिविनायक संकुल परिसरात मोकळ्या जागेत पक्षाध्यक्ष ना. अजितदादा पवार प्रचार सभेला संबोधित करणार आहेत. या व्यापारी मेळाव्यासह प्रचार सभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी आणि मित्र पक्षाचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत होणाऱ्या व्यापारी मेळावा आणि प्रचार सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीडच्या वतीने करण्यात आले आहे.





बीड – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांनी बीड जिल्ह्यातील नगर परिषद निवडणुक संदर्भात चर्चा व आढावा घेतला.यावेळी आमदार संदीप भैय्या क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के,माजी आमदार सय्यद सलीम भाई, नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ. स्मिताताई विष्णू वाघमारे, सुभाषराव सपकाळ, बाळासाहेब गोरे, विष्णू वाघमारे,आबा कर्डिले तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## संपादकीय

### कालमर्यादा नाही

राज्य विधानसभेने पारित केलेल्या विधेयकांना मंजुरी देण्यास राज्यपाल विलंब करीत असल्याच्या मुद्यावर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी महत्त्वाचा निकाल दिला. विधेयकांना मंजुरी देण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्यावर कालावधीचे बंधन घालण्याचा अधिकार न्यायालयाला नाही. राज्यपालांवर कोणतीही वेळमर्यादा लादता येणार नाही, मात्र ते विधेयकांना अनिश्चित काळासाठी रोखून धरू शकत नाहीत. राज्यपालांना त्यांच्या निर्णयासाठी जबाबदार धरता येत नाही.

परंतु त्यांच्या निर्णयांची न्यायालयीन पडताळणी केली जाऊ शकते. विलंब झाल्यास आम्ही हस्तक्षेप करू, असा महत्त्वपूर्ण निर्णय गुरुवारी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या नेतृत्वाखालील पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने दिला. राज्यपाल किंवा राष्ट्रपती यांना विधेयकांवर निर्णय देण्यासाठी न्यायालयाकडून वेळमर्यादा घालता येईल का, अशी विचारणा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केली होती. न्यायालयाने स्पष्ट केले की, राज्यपाल विधेयके अनिश्चित काळासाठी प्रलंबित ठेवू शकत नाहीत, मात्र मंजुरी न दिल्यास ते विधेयक विधानसभेला परत पाठवणे आवश्यक आहे. पण त्यांना निर्णय देण्यासाठी कोणतीही निश्चित कालमर्यादा न्यायालय लादू शकत नाही. या निर्णयामुळे आता राज्यपाल, राष्ट्रपती आणि न्यायालय यांच्या भूमिकांच्या संवैधानिक सीमारेषा अधिक स्पष्ट झाल्या आहेत. सुनावणी दरम्यान न्यायालयाने म्हटले की, राज्यपालांकडे मंजुरी देणे, रोखणे किंवा विधानसभेला परत पाठवणे हे पर्याय उपलब्ध आहेत.

# बीड शहर स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी नगर पालिकेची सत्ता ना.अजितदादांच्या हाती द्या - आ. विजयसिंह पंडित



**राष्ट्रवादीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ प्रभाग क्र.४, १४ आणि १७ मध्ये कॉर्नर सभेला उत्स्फुर्त प्रतिसाद**

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरात विकासाचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबरोबरच रस्ते आणि नाली बांधकाम कुठेच नसल्यामुळे शहराची अवस्था बकाल झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील जनता विविध प्रश्नांना तोंड देत आहे, शहराच्या उज्वल भविष्यासाठी आता परिवर्तनाची गरज आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. शहराचे विकासाचे प्रश्न गतीने सोडविण्यासाठी आणि बीड शहराला बारामती सारखेच स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी नगर पालिकेची सत्ता ना.अजितदादांच्या हाती द्या. कारण विकास कामांसाठी ते निधी कमी पडू देणार नाहीत याचे मी वचन देतो. राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्रपक्षाचे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून विजयी करून पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांना विकासासाठी साथ द्या असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले.

बीड शहरातील प्रभाग क्र. ४, १४ आणि १७ मध्ये आयोजित केलेल्या कॉर्नर सभेत ते बोलत होते. तीन्ही प्रभागात झालेल्या या प्रचार सभेला मतदारांना उत्स्फुर्तपणे प्रतिसाद दिला. कार्यकर्ते आणि मतदारांनी ही निवडणुक हातात घेतल्यामुळे बीड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शिवसेना - शिवसंग्राम पक्षाचे पारडे जड झाले आहे.

बीड नगर परिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे तसेच प्रभाग क्र.४ - अ च्या उमेदवार सौ.टाक वैष्णवी रामसिंग, प्रभाग क्र. ४ - ब च्या उमेदवार सौ.हातागळे लताबाई धोंडीराम, प्रभाग क्र.१४ - अ चे उमेदवार शिंदे प्रमोद गोरख, प्रभाग क्र. १४ - ब च्या उमेदवार सौ.बनसोडे आरती आणि प्रभाग क्र.१७ - अ चे उमेदवार ड.धांडे महेश अर्जुन, प्रभाग क्र. १७ - ब च्या उमेदवार शेख शबनम बिलाल यांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांच्या कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष मोईन मास्टर, माजी नगरसेवक दिलीप गोरे, शेख निजाम, सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे, फारुक पटेल, शेख मुजीब, शेख खजीर, पुरुषोत्तम विर, रामसिंग टाक, पांडुरंग आवारे, विनोद हातांगळे, विजय चांदणे, गणेश गायकवाड, थोरात आण्णा, अशफाक इनामदार, शाहेद पटेल यांच्यासह राष्ट्रवादी व मित्र पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि विविध प्रभागाचे उमेदवार उपस्थित होते.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९५६/२०२५**
वसंताबाई शिवनारायण झंवर विरुध्द निरंक
**(मार्फत–ॲड.एल.जी.कुलकर्णी)**

ज्याअर्थी मयत नामे **शिवनारायण शाळीगराम झंवर हे दि.१६.१२.१९९९ रोजी सिरसमार्ग ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.वसंतबाई शिवनारायण झंवर, वय–७८ वर्षे, धंदा–शेती, रा.सिरसमार्ग ता.गेवराई जि.बीड, २.गणेश बालाप्रसाद बाहेती, वय–२८ वर्षे, धंदा–नौकरी, रा.गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **शिवनारायण शाळीगराम झंवर, रा.सिरसमार्ग ता.गेवराई जि.बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.–/–/–** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –२४/१२/२०२५**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# आकस्मिक मृत्यू : देशात महाराष्ट्र अव्वल स्थानी एनसीआरबी चा धक्कादायक स्फोट

प्रतिनिधी @ परभणी

संपूर्ण देशपातळीवर नोंद झालेल्या आकस्मिक मृत्यूच्या घटनांमध्ये महाराष्ट्र राज्य अव्वल स्थानी असल्याचा स्फोट एनसीआरबी ने केला आहे. या खळबळजनक वृत्तामुळे महाराष्ट्र राज्यातील ढिसाळ आरोग्य यंत्रणा आणि ढेपाळलेली रस्ते वाहतूक नियोजन यंत्रणा जबरी टीकेच्या ऐरणीवर आली आहे.

नॅशनल रेकॉर्डस् क्राईम ब्युरो द्वारा प्रसारित देशपातळीवरील झालेल्या मृत्यूंच्या ६३,६०९ या एकूण आकडेवारीत २१,३१० एवढ्या आकस्मिक मृत्यूंची नोंद एकट्या महाराष्ट्रात आहे. तद्वतच देशातील प्रत्येक तिसरा आकस्मिक मृत्यू हा महाराष्ट्रात झाला आहे. मृत्यूचा हा वाटा अत्यंत चिंताजनक असून त्याची टक्केवारी ३३.५ एवढी आहे.

तामिळनाडू मध्ये अचानक झालेल्या आकस्मिक मृत्यूची नोंद अंदाजे ४,१०० एवढी आहे. तर, उत्तर प्रदेशात झालेली मृत्यूची नोंद ३,७०० निर्देशित आहे. किंबहुना अनेक मोठ्या राज्यांच्या एकत्रित एकूण संख्येपेक्षा एकट्या महाराष्ट्रात आकस्मिक मृत्यू सर्वाधिक आहेत. राज्यातील २१,३१० आकस्मिक मृत्यूंपैकी १७,६६१ पुरुष, ३,६४८ महिला तर एक ट्रान्सजेंडर एवढी नोंद केली गेली आहे.

राष्ट्रीय स्तरावरील एकूण आकस्मिक मृत्यूंपैकी ३५,६३७ जण हृदयविकाराने मृत्यूमुखी पडले आहेत. तर, उर्वरित २७,९७२ जण इतर कारणांमुळे मृत्यूमुखी पडले आहेत. महाराष्ट्र राज्यात हृदयविकाराने मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांची संख्या १४,१६५ एवढी आहे.



ताज्या आकडेवारीनुसार जी काही माहिती पुढे आली आहे, ती अत्यंत चिंताजनक अशीच म्हणता येईल. त्यात प्रामुख्याने रस्ते अपघातानंतर आकस्मिक मृत्यू हे मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे.अशा प्रकारचे अपघात पाण्यात बुडणे, विषबाधा होते किंवा रस्ते अपघात या सारख्या ओळखण्यायोग्य घटनांशी संबंधित नसलेल्या कारणांमुळे होतात. २०२३ मध्ये राष्ट्रीय स्तरावर झालेल्या आकस्मिक मृत्यूचे प्रमाण १४.५ टक्के होते. मागील वर्षांच्या तुलनेत वाढले जाऊन १२.३ टक्के एवढे झाले. महाराष्ट्रात एकूण अपघाती मृत्यूची सर्वाधिक संख्या ही आकस्मिक मृत्यू म्हणून नोंदवले गेले आहेत. तामिळनाडू, यु.पी.त झालेल्या अचानक मृत्यूची नोंद लक्षणीय नोंदवलेल्या एकूण ६९,८०९ मृत्यूंपैकी सर्वाधिक मृत्यू हे आकस्मिक होते. तामिळनाडू व यु.पी.सह इतर राज्यांमध्येही अचानक मृत्यूची संख्या लक्षणीय अशीच नोंदवली गेली. परंतु त्यांचा तो वाटा महाराष्ट्रापेक्षा कमीच राहिला आहे, हे विशेषत्वाने सांगता येईल.

*सन २०२२ मध्ये देशपातळीवर नोंदवली गेलेली आकस्मिक मृत्यूची संख्या ५६,६५३ एवढी होती. सन २०२३ मध्ये ती वाढली जाऊन ६३,६०९ पर्यंत गेली. म्हणजेच ६,९५६ प्रकरणांची वाढ झाली. मागील वर्षीच्या तुलनेने महाराष्ट्रात २,२५७ प्रकरणे वाढली गेली. सन २०२३ मध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद झालेली राज्येदेशात एकूण ६३,६०९ पैकी महाराष्ट्रात - २१,३१०, तामिळनाडू - ४,१४२, तु.पी.-३,७०९, कर्नाटक - ३,६१७ तर मध्य प्रदेशात - ३,०५३ अशा प्रकारची विगतवारी असून ती चिंताजनक अशीच म्हणता येईल.


# गुरुनाळ येथील बौद्ध समाजातील शिल्पा व्यंकटराव शिंदे हिला

**कला ब्युटी कला आविष्कार पुरस्काराने सन्मानित**

देवणी /प्रतिनिधी

देवणी तालुक्यातील गुरनाळ येथील वडील मजुरी करून शिक्षणासाठी अहोरात्र प्रयत्न केले आहेत ग्रामीण भागातली असणारी ही मुलगी आई वडील गरिबीतून संसार करून माझी मुलगी काहीतरी बनवा स्वप्न त्यांच्या मनाशी बाळगत होता या मुलीने स्वतः निर्णय घेऊन चांगल्या दर्जा शिक्षण घेतली आहे शिल्पा व्यंकटराव शिंदे हिला ब्यूटी क्षेत्रात पुण्यामधून प्रथम क्रमांक पटकावल्या बद्दल सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री तेजा देवकर यांच्या हस्ते कला आविष्कार या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हिच्या या यशाबद्दल पुणे येथील ब्ल्यू स्टोन अकॅडमी आणि प्रीती ठाकूर यांच्या सहकाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले आहे. तिच्या या कार्याची दखल घेऊन हा प्रतिष्ठीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. ही तिच्या परिवारासाठी आणि तिच्या क्षेत्रासाठी अभिमानाची गोष्ट बाब आहे.खूप कष्टाळू मुलगी आहे, ती प्रत्येक क्षेत्रात परिपूर्ण आहे.स्वभाव मनमिळाऊ स्वभाव, सगळ्यांना हसत खेळत असणारे ही मुलगी तिच्या अथक परिश्रमातून आणि समर्पणातून तिने हे यश मिळवले.तिला पुढच्या वाटचालीस शिंदे आणि देवनीकर



परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा तिचे कार्य असेच प्रेरणादायी राहो आणि तिला भविष्यात ही असच यश मिळत राहो ही सदिच्छा व देवणी तालुक्यातील सर्व स्तरातून पत्रकार,वकील, सामाजिक कार्यकर्ते सामाजिक संघटना ग्रामीण भागातून महिला पुरुष युवक युवती त्या मुलींचे अभिनंदन केले आहेत

# भाजपकडून भाषिक प्रांतवाद पेटवण्याचा प्रयत्न

**उद्धव ठाकरेंचा अर्णव खैरे प्रकरणावर भाष्य करत आरोप; म्हणाले – भाजपचा ढोंगीपणा उघड**

प्रतिनिधी @ मुंबई

भाजपकडून मुंबई व महाराष्ट्रात भाषिक प्रांतवाद पेटवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी कल्याण येथील अर्णव खैरे आत्महत्या प्रकरणावर भाष्य करताना केला. भाजप व संघ मुंबईत भाषिक प्रांतवादाचे विष पसरवत आहेत. पण त्याचे खापर आपल्यावर फोडण्याचा प्रयत्न करत आहेत. काल-परवा एक दुर्दैवी घटना घडली. ती घडायला नको होती. भाषेवरून कुणाचे खून करा, कुणाला



मारा अशी आपली मागणी नाही, असे ते म्हणालेत. या प्रकरणी ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे व किशोरी पेडणेकर यांनीही भाजपवर टीकेची झोड उठवली आहे.

**पालघर साधू हत्याकांडावरून भाजपवर निशाणा**

ते पुढे म्हणाले, भाजप हा कपट कारस्थान करणारा पक्ष आहे. ज्या पद्धतीने त्यांनी पक्ष फोडले, त्याच पद्धतीने ते आता घरेही फोडत आहेत. त्यांचा हिंदुत्त्वाचा फुगाही आता फुटला आहे. पालघरमध्ये आपण सत्तेत असताना जे साधूंचे हत्याकांड झाले, त्यातील आरोपींना भाजपने दोन दिवसांपूर्वी आपल्या पक्षात प्रवेश दिला. त्यानंतर बोभाटा झाला. भाजपला वाटले होते की, आपले हे पाप लपून जाईल. पण त्यांचे पाप लपले नाही. चव्हाट्यावर आले. त्यानंतर त्यांनी घाईगडबडीने त्या आरोपीच्या पक्ष प्रवेशाला स्थगिती दिली. म्हणजेच काय की त्यांचे हिंदुत्त्वाचे ढोंग फुटले आहे.

**भाषिक प्रांतवाद सुरू झाला कुठून?**

उद्धव ठाकरे यावेळी अर्णव खैरे प्रकरणावर भाष्य करताना म्हणाले, आता भाजप व संघ भाषिक प्रांतवाद पेटवत आहेत. काल-परवा एक दुर्दैवी घटना घडली. ती घडायला नको होती. भाषेवरून कुणाचे खून करा, कुणाला मारा अशी आपली मागणी नाही. पण कुणी कोणत्याही भाषेने कोणत्याही भाषेवर अत्याचार करू नये. हा भाषिक प्रांतवाद सुरू झाला कुठून? मागाठाणे येथील एकाने (शिंदे गटाचे आमदार प्रकाश सुर्वे) मराठी माझी आई आहे आणि माझी आई मेली तरी चालेल असे विधान केले होते. हे लोक अशा पद्धतीने जनतेत राग पसरवत आहेत. त्यांच्याकडून दुसरी अपेक्षा काय करायची.



## ‘कमी मूळ वेतन’असलेल्या कर्मचा-यांनाच ओव्हरटाईमसाठी प्राधान्य

प्रतिनिधी @ पुणे

राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) आपल्या वाढत्या खर्चावर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि दैनंदिन उत्पन्नाचा ताळमेळ साधण्यासाठी ओव्हरटाईम (अतिकालीन) ड्युटीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.चालक आणि वाहकांच्या ‘ओव्हरटाईम भत्त्या’च्या नियमावलीत मोठे बदल केले आहेत. यापुढे ओव्हरटाईम देताना ‘कमी मूळ वेतन’ असलेल्या कर्मचा-यांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत; तसेच ठराविक कर्मचा-यांनाच जास्त ओव्हरटाईम दिला जात असल्याचे आढळल्यास संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई केली जाणार आहे.महामंडळाचे महाव्यवस्थापक (वाहतूक) या संदर्भातील परिपत्रक सर्व विभाग नियंत्रकांना जारी केले आहे. एसटी महामंडळाच्या आर्थिक उत्पन्नात मोठी तफावत वाढत आहे. त्यामुळे दैनंदिन उत्पन्न वाढवण्याच्या संदर्भात घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये अतिकालीन भत्त्याबाबत होणा-या खर्चावर नियंत्रण नसल्याचे समोर आले.

# क्रूझर– ट्रॅक्टरच्या अपघातात ५ भाविक ठार

धाराशिव /प्रतिनिधी

धाराशिवमध्ये शनिवारी सकाळी झालेल्या एका भीषण अपघातात नळदुर्ग येथे देवदर्शनाला जाणाऱ्या ५ भाविकांचा बळी गेला. टायर फुटल्यामुळे भरधाव वेगातील जीप एका ट्रॅक्टरला धडकल्यामुळे ही दुर्घटना घडली. या घटनेत इतर ८ जण गंभीर जखमी झालेत. त्यापैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



यासंबंधीच्या माहितीनुसार, धाराशिव जिल्ह्यातील सोलापूर - हैदराबाद महामार्गावरून शनिवारी सकाळी एक क्रूझर जीप भरधाव वेगात जात होती. या गाडीतील प्रवाशी सोलापूरहून नळदुर्ग येथे देवदर्शनासाठी जात होते. ही क्रूझर धाराशिवच्या अणदूर परिसरात आली असताना अचानक तिचे टायर फुटले. यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून क्रूझर रस्त्यात उभ्या असणाऱ्या एका ट्रॅक्टरला धडकली. त्यानंतर ती रस्त्यावरच उलटली. या घटनेत ५ जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांत ३ महिलांचा समावेश आहे. क्रूझरमधील इतर ८ जणही या अपघातात गंभीर जखमी झालेत. त्यांना उपचारासाठी सोलापूर स्थित शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

# तहसीलदारांच्या टेबलवर निकृष्ट धान्य फेकले

वडवणी /प्रतिनिधी

वडवणी शहरातील व तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानात गेल्या दोन



महिन्यापासून व नोव्हेंबर २०२५ च्या महिन्यात तालुका पुरवठा विभागाकडून स्वस्त धान्य दुकानातून अतिशय निकृष्ट दर्जाचे ज्वारी, तांदूळ, गहू वाटप होत आहे. धान्यांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात जाळी,माती, कचरा आहे, असे निकृष्ट व दर्जाहिन धान्याचे वितरण स्वस्त धान्य दुकानातून वाटप करण्यात येत आहे. याची माहीती तहसिलदार यांना नसावी का.? असा प्रश्न उपस्थित करीत निकृष्ट दर्जाचे धान्य राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष गणेश म्हेत्रे यांनी शुक्रवार २१ नोव्हेंबर रोजी तहसिलदार यांच्या टेबलवर फेकले. या प्रकारामुळे तहसिलदार यांनी लगेच पावले उचलत सदरील धान्य तपासणीसाठी पाठविले आहे.

शासनाच्या आदेशानुसार नवीन व दर्जेदार धान्य वितरण करणे आवश्यक असताना नियमबाह्य धान्य वितरित करण्याचा धक्कादायक प्रकार वडवणी शहर व तालुक्यात सुरू आहे.या धान्याला जनावरही तोंड लावणार नाहीत अशी परिस्थिती आहे.असे निकृष्ट धान्य ज्वारी,गहु,तांदूळ वितरित केले जात असल्याचे दिसत आहे.

# बीड शहरातील सुभाष रोडवरील ४० अतिक्रमणांवर घणाघाती कारवाई

**रस्ते मोकळे, अतिक्रमण न करण्याचे प्रशासनाचे आवाहन**

बीड ।प्रतिनिधि

शहरातील मुख्य रस्त्यांवरील वाढत्या अतिक्रमणांना आळा घालण्यासाठी बीड नगरपालिका व पोलिस प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवत (शुक्रवारी) मोठी कारवाई केली. सुभाष रोड, बसस्टँड परिसर, साठे चौक आणि माळीवेस भागातील तब्बल ४० अतिक्रमणांवर हातोडे चालवून रस्ते मोकळे करण्यात आले. हातगाड्या, स्टॉल्स, पत्र्यांचे शेड, बांबू-मातीची बांधकामे यांची पाडकामे करून वाहतुकीसाठी मार्ग सुरळीत करण्यात आला.

फेब्रुवारी आणि जूनमध्येही अशाच प्रकारची कारवाई करण्यात आली होती. मात्र त्यानंतर काही व्यापारी व फेरीवाले पुन्हा अतिक्रमण करू लागल्याने प्रशासनाने ही पुनःमोहीम हाती घेतली. आजची कारवाई जिल्हा वाहतूक शाखेचे प्रमुख एपीआय सुनील सनाप, अदिनाथ मुंडे, संजय तुलें, चिंतामण



शिंदे, राहुल घाडगे, संतोष मोरे, तसेच चालक संतोष हारके व नारायण वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. नगरपरिषदेच्या टीम लीडर्समध्ये मुन्ना गायकवाड, सुजित जाधव, विकी डंगट, जावेद शेख, शरद खुपसे, राम रोकडे, किरण शिंदे, लखन साबळे यांचा सहभाग होता.

मोठ्या प्रमाणात पथारे, गाड्या व शेड हटवल्यामुळे संबंधित परिसरातील रस्ते पुन्हा मोकळे झाले असून वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत झाली आहे. प्रशासनाने नागरिक, व्यापारी आणि फेरीवाल्यांना पुन्हा अतिक्रमण न करण्याचे स्पष्ट आवाहन केले आहे.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-७९६ दि. . .२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फय्याज रियाज शेख, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | फय्याज रियाज शेख | स्वतः | १९.०७.२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-११४८ दि. २४.१० .२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **नाजम चाँदखाँ पठाण रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नाजम चाँदखाँ पठाण | स्वतः | ०५.०३.१९९६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०२५ दि. -.- .२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रिजवाना मुसा सय्यद, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रिजवाना मुसा सय्यद | स्वतः | ०४.०९.१९९० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८९८ दि. -.- .२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शाकिर कलिंदर शेख, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शाकिर कलिंदर शेख | स्वतः | ०७.०८.२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# नातवाच्या मारहाणीत आजीचा मृत्यू !

केज तालुक्यातील खळबळजनक घटना !

प्रतिनिधी @ केज

एका नातवाने आजीला काठीने केलेल्या मारहाणीत उपचारा दरम्यान आजीचा मृत्यू झाल्याची खळबळ जनक घटना केज तालुक्यात घडली आहे. या बाबतची माहिती अशी की, दि. १५ नोव्हेंबर रोजी सोनीजवळा ता. येथे रामदास पांडुरंग गवळी वय (२८ वर्ष) वर्ष याने त्याची आजी पंचफुला रामकिसन गवळी वय (६८ वर्ष) यांना काठीने मारहाण केली. त्यात पंचफुला रामकिसन गवळी या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्या नंतर त्यांना स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथे



दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथे उपचार सुरू असताना दि. २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७:०० वाजता त्यांचे निधन झाले. मारहाणीत उपचारा दरम्यान पंचफुला रामकिसन गवळी यांचे निधन होताच मारहाण करणारा नातू रामदास पांडुरंग गवळी याला युसुफवडगाव पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी युसुफवडगाव पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे हे अधिक तपास करीत आहेत. रामदास गवळी मनोरुग्ण असल्याची माहिती :- पंचफुला गवळी यांना मारहाण करणारा त्यांचा नातू रामदास गवळी हा मनोरुग्ण असल्याची माहिती मिळत असून तो विवाहित आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यातील अग्नीशमन गाडीची दुचाकीला धडक; चौघे गंभीर जखमी

प्रतिनिधी @ किल्ले धारूर

तेलगाव धारूर रस्त्यावरील घटना पती, पत्नी, दोन मुली जखमींमध्ये समावेश परभणीहून धारूरमार्गे खामगाव पंढरपूर रस्त्यावर जात असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यातील अग्निशमन वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याची घटना दि २२/११/२०२५ वार शनिवारी दुपारी पावणेदोन वाजता धुनकवड फाट्याजवळ घटना घडली. या अपघातात एकाच कुटुंबातील चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अंबाजोगाई येथे उपचार सुरू आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार व माजलगाव हे तेलगावहून केजकडे निघाले असताना त्यांच्या ताफ्यातील अग्निशमन दलाची गाडी (एमएच ०२, जीएच५७३२) वेगाने धारूरकडे येत होती. तेलगाव-धारूर रस्त्यावर असलेल्या 'जंपिंग' मुळे वाहन उडाले आणि समोरून येणाऱ्या दुचाकीवर (एमएच ४४, व्ही १५१८) जाऊन आदळले. ही दुचाकी विष्णू दामोदर सुदे हे चालवत होते. या अपघातात दुचाकीचालक विष्णू सुदे सह पत्नी कुसुम आणि दोन लहान मुली आक्षरा व राधिका या जखमी झाल्या. अपघातानंतर तत्काळ जखमींना धारूर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारांसाठी दाखल करण्यात आले. मात्र, दुखापती गंभीर असल्यामुळे त्यांना अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयातून लातूर येथे पाठवले आहे. परंतु त्यांना लातुर मधील सह्याद्री खाजगी दवाखान्यात उपचारासाठी आयशु मध्ये ठेवण्यात आले आहे तरी ही घटना गंभीर झाली आहे तरी तात्काळ शासनाने मदत केली पाहिजे अत्यंत गरीब परिस्थिती असून खाजगी संस्था मध्ये काम करणारा विष्णूसुदे यांच्यावर कुटुंब चालत होते परंतु आता त्यांना शासनाने आर्थिक मदतीची गरज केली पाहिजे असे आदिवासी समाजातील नागरिकांनी जोर लावून धरले आहे त्यांना खूप प्रमाणात नवरा बायको यांना डोक्याला मार लागल्याने ते लातुर मधील सह्याद्री हॉस्पिटल मध्ये त्यांच्यावर उपचार सुरू आहेत





# परराज्यातील शिक्षक देणार विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे धडे- महत्त्वाचा व नाविन्यपूर्ण उपक्रम

शहरातील एज्युव्हीजन आणि न्यू इरा किड्स इंग्रजी शाळेचा स्तुत्य उपक्रम

अर्धापूर :- उध्दव सरोदे

अर्धापूर शहरात व तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत कमी कालावधी मध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या एज्युव्हीजन प्री-प्रायमरी व न्यू इरा किड्स इंग्रजी शाळेतील विद्यार्थ्यांना परराज्यातील शिक्षक इंग्रजी विषयाचे धडे देणार आहेत.सतत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती व उज्वल भविष्या संदर्भात विविध उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासंदर्भात अर्धापूर शहरातील नामांकित झालेली एज्युव्हीजन प्री प्रायमरी आणि न्यू इरा किड्स इंग्रजी शाळा अग्रेसर असते.अगदी






त्याच धर्तीवर आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही पर राज्यातील मूळ इंग्रजी माध्यमातील शिक्षकांचा सहवास लाभावा यासाठी शाळेचे संचालक प्रा.प्रवीण रावते यांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणारे परराज्यातील शिक्षक यांचा शाळेत समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

# बलभीम महाविद्यालयात पायाभूत संशोधन पद्धतीवर कार्यशाळा संपन्न

बीड (प्रतिनिधी)

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने दि.१९ नोव्हेंबर २०२५ रोजी प्राचार्य डॉ. संतोष उंदरे यांच्या मार्गदर्शनात 'भौतिकशास्त्र विषयातील पायाभूत संशोधन' या विषयावर ऑनलाईन पद्धतीने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत डॉ. विजयकिरण नरवाडे, सायन्स कॉलेज ,नांदेड यांनी 'भौतिकशास्त्रातील संशोधन पद्धती' या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, संशोधनाचे प्रकार, संशोधन करण्यासाठी आवश्यक असलेली सामग्री गोळा करणे, त्यावर संशोधन करणे, संशोधनाचे मूल्य सांभाळून भौतिकशास्त्र विषयातील सामाजिक प्रश्नांवर संशोधन होणे गरजेचे आहे. या कार्यशाळेचे प्रास्ताविक भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. टी. ताटे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. दीपाली अंधारे यांनी केला तर आभार प्रा. राजेश्वरी पांगरकर यांनी मानले.या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ . के. आर देसाई, डॉ. आर. आर.भोसले, प्रा. जी. बी. भोसले , डॉ.




स्वप्नील जाधव , डॉ. गोविंद नाईकोडे , प्रा. सुचिता वाघ , प्रा. अर्जुन मेरड, प्रा सना अख्तर यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेस पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.




जिंतूर (प्रतिनिधी)

दिनांक २१ नोव्हेंबर जिंतूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मतदान जनजागृती अभियान अंतर्गत निवडणूक कार्यासाठी नेमलेल्या कर्मचारी मतदारांना जागृत करण्यासाठी मतदान जनजागृतीसाठी जिल्हा परिषद प्रशाला कौसडी या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या कला शिक्षक ज्ञानेश्वर बर्वे यांनी भव्य व आकर्षक रांगोळी काढली. या रांगोळीच्या माध्यमातून उपस्थित असणाऱ्या सर्व मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क समजावून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. उपस्थित सर्वांनी सदर कलाकृतीचे विशेष कौतुक केले. या रांगोळीच्या माध्यमातून मतदान जनजागृतीच्या ज्ञानेश्वर बर्वे यांच्या कार्याचा उपविभागीय अधिकारी सेलू तथा निवडणूक निर्णय अधिकारी जिंतूर नगर परिषद शैलेश लाहोटी, तहसीलदार जिंतूर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजेश सरवदे, मुख्याधिकारी उमेश ढाकणे, उपमुख्याधिकारी अनिल समिंद्रे, नायब तहसीलदार निवडणूक सुग्रीव मुंढे, मिडिया पथक प्रमुख नायब तहसीलदार प्रशांत राखे, गटशिक्षणाधिकारी तथा मतदान जनजागृती पथक प्रमुख त्र्यंबक पोले यांनी गुणगौरव व विशेष सन्मान केला. त्यांच्याकडे असलेल्या कला कौशल्याचे विशेष कौतुक केले. या कार्यासाठी राजेंद्र ढाकणे, मयूर जोशी कपिलदेव घुगे, प्रवीण घुले, दिनकर घुगे, मारोती घुगे यांनी इतर सहकार्य केले.

## सर सय्यद अहेमद खान
# सेमी इंग्रजी व पिपल्स माध्यमिक शाळेत पालक मेळावा संपन्न

दिनांक २२ नोव्हेंबर रोजी सर सय्यद अहमद खान सेमी इंग्रजी शाळेत पालक मेळावा घेण्यात आला. पालक मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी चे चेअरमन हसीन अख्तर साहेब होते व प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सना मलिक साहेबा, अश्फाक इनामदार, नबील जमा व अब्दुल वकील सर उपस्थित होते. सर सय्यद अहमद खान शाळा नेहमी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करत आहे. पालकांना जागरूक करण्यासाठी साठी शाळेचे सचिव मा. अब्दुल वकील सर यांनी उपदेश करताना म्हणाले की आज पालकांनी दक्ष असावे, पालकांनी विद्यार्थ्यांच्या प्रत्येक गोष्टी वर लक्ष दिले पाहिजे. आपला पाल्य सकाळी उठल्या पासून तो रात्री झोपे पर्यंत काय काय गोष्टी करतो काय काम करतो कुठे जातो कोणत्या मित्र किंवा मैत्रिणीला भेटतो यावर बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे. अभ्यास करताना तो अभ्यासच करतो का स्वतः हेही पाहिले पाहिजे. मोबाईल चा वापर जास्तीत जास्त











टाळावा. पालकांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्व नेहमी पटवून द्यावे. कारण आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाला खूप महत्व आहे. जो शिकेल तोच टिकेल. अशा प्रकारे वकील सरानी शिक्षणाचे महत्त्व व पालका मध्ये जागरूकता यावी यासाठी उपदेश केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदील सर यांनी केले व आभार प्रदर्शन इमरान सर यांनी केले.

# आष्टी आतालुक्यात बिबट्याचा धुमाकूळ

# वन विभागाने तात्काळ दखल घेऊन बिबट्यांना पिंजऱ्यात कैद करावे--

## स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष दीपक (भैय्या) गरुड

प्रतिनिधी @ आष्टी

आष्टी तालुक्यात बिबट्याने धुमाकूळ घातला असून वन विभागाने मात्र बघ्याची भूमिका घेतल्याचे दिसून आले असून आष्टी वन विभागाने तात्काळ बिबट्यासाठी पिंजरा लावून कैद करावे अशी मागणी स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष दिपक (भैय्या) गरुड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केली आहे .

पुढे सांगितले की , एकीकडे बिबट्याची दररोज संख्या वाढत असून दुसरीकडे वनविभागाची उदासीन भूमिका पहावयास मिळत आहे .

तालुक्यातील अनेक शेतकरी/ शेतमजूर सध्या शेतात काम करताना दिसत असून दररोज बिबट्या आला गेल्याच्या चर्चा ऐकव्यास मिळत असून यामध्ये शेतकरी/ शेतमजूर भयभीत झाले असून बिबट्या केव्हाही मनुष्य प्राण्यावर हल्ला करू शकतो हे वन विभागाने नाकारू नये . शेतकरी/ शेतमजूर /नागरिक कामा निमित्ताने गेलेले उशिरा का होईना कामा वरुन ये - जा चालु असते. आष्टी तालुक्यातील सर्व नागरिकांनी सतर्क राहुल सावधानता बाळगावी अशी विनंती केली असून सध्या वाघुळुज/ पठार भाग/ कुंभारवाडी/ दौलावडगाव /सुलेमान देवळा/ पाटण सांगवी, आदी भागात बिबट्या आला गेल्याच्या चर्चा चालू असून या चर्चेने अनेक नागरिक /माता / भगिनी लहान मुले भयभीत झाले आहेत .

सुलेमान देवळा या भागात गेल्या अनेक दिवसापासून दोन बिबटे कायम मुक्कामी असल्याचे



समजले असून सुद्धा वनविभाग गाढ झोपेत असल्याचे समजते. बिबट्या नर भक्षक होऊन नागरिकांच्या मृत्यूची आष्टी वन विभाग वाट तर पाहत नाही ना ? असा संतापजनक सवाल आज स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष दिपक (भैय्या) गरुड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात व्यक्त केला .

# शेतीच्या वादावरून दोन भावाभावात भांडण

प्रतिनिधी @ केज

शेतीच्या वादावरून दोन भावाभावात भांडण झाले असून १४ जणांच्या विरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.केज येथील मंगेश प्रल्हाद रांजणकर हे दि. १६ रोजी सायंकाळी ५:३० वाजण्याचे सुमारास त्यांची दोन मुले नामे मयुर, मंदार असे जमीन गट नं ४१५ मध्ये शेतात कामासाठी गेले होते. त्याच वेळी त्यांचा भाऊ ओमप्रकाश रांजणकर हा शेतात होता. त्याचे सोबत अनोळखी पाच लोक व एक ट्रॅक्टर देखील होते. ते सर्वजण मंगेश रांजणकर यांच्या ताब्यात असलेल्या जमिनीत पेरणी करीत होते. मंगेश रांजणकर आणि त्यांच्या मुलांना पाहताच ते सर्वजण ही शेताच्या बांधा जवळ येवुन त्यांनी मंगेश रांजणकर आणि त्यांच्या मुलांना आडवले व म्हणाले कि, तुम्ही या जमीनीमध्ये यायचे नाही. आज पर्यत तुम्ही ही जमीन वहीत केली. आता येथुन पुढे तुम्ही कसे या जमीनीत येतात ? ते मी बघतोच. असे म्हणुन ओमप्रकाश रांजणकर आणि त्यांच्या सोबतच्या अनोळखी व्यक्ती या सर्वांनी त्यांना शिवीगाळ केली. तसेच त्यांना शेतात जाऊ दिले नाही. जर या जमिनीचा नाद केला तर तुमच्या कुटुंबात कोणालाही जिवंत ठेवणार नाही. या जमिनीत पाय टाकायचा नाही. आले तसे परत चालते जा. असे म्हणून धमकी दिली.

तसेच दि. १२ नोव्हेंबर रोजी सुद्धा सकाळी ९:३० वाजता मंगेश रांजणकर हे त्यांच्या दोन मुलांसह शेतात गेले असता त्यांना त्यांचा भाऊ ओमप्रकाश रांजणकर त्याचा मेहुणा अविनाश दिगांबर बेदरे यांनी ७ अनोळखी लोक आणुन त्यांना अडविले आणि अश्लील भाषेत शिवीगाळ केली.मंगेश रांजणकर यांच्या तक्रारी वरून केज पोलिस ठाण्यात ओमप्रकाश रांजणकर, अविनाश बेदरे यांच्यासह अनोळखी १४ जणांच्या विरुद्ध गु. र. नं. ६४८/२०२५ भा. न्या. सं. १२६(२), १८९(२), १९०,१९१(२), २९६, ३५१(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आले आहे.पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कॉन्स्टेबल विष्णू नागरगोजे हे पुढील तपास करीत आहेत.

# अतिक्रमण धारकांना खरा न्याय लक्ष्मण आण्णांनी चार वर्षापूर्वीच दिला- शेख शब्बीरभाई

## पंडितांचा पि.टी.आर. प्रश्न म्हणजे आयजीच्या जिवावर बायजी उध्दार- दाऊद पठाण

गेवराई ।प्रतिनिधी

शहरातील संजयनगर,साठे नगर, संघमित्रनगर, इस्लामपुरा, अचानकनगर, मधील अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या अतिक्रमण धारकांना हाक्काचा पि.टी.आर मिळावा म्हणून लक्ष्मण आण्णांनी नगराध्यक्ष असतांना दि. २१ सप्टेंबर २०१२ रोजी अतिक्रमण धारकांचा मोर्चा आयोजित केला होता त्यावेळी हाजारोच्या संख्येने अतिक्रमण धारक उपस्थित होते.

गेवराई विकास आघाडीच्या आंदोलनाची दखल घेत तत्कालीन जिल्हाधिकारी सुनील केंद्रेकर यांनी दै. पार्श्वभूमीचे संपादक गंमत भाऊ भंडारी सर यांच्या मोबाईल वरून लक्ष्मण आण्णांना संपर्क साधला व तत्कालीन उपविभागीय अधिकारी संतोष राऊत व पि.आय. हानुमत गायकवाड यांनी मोर्चाला सामोरे येत आश्वासन देत आंदोलन थांबवले होते

तेव्हा पासून लक्ष्मण आण्णांनी अतिक्रमण धारकांना हाक्काचा पि.टी.आर. मिळावा म्हणून प्रमाणिक प्रयत्न केले त्यानंतर २०१४ ला लक्ष्मण आण्णा आमदार म्हणून निवडून आले तेव्हा त्यांनी मुख्यमंत्री नरेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून अतिक्रमण धारकांची बाजु लावून धरली २०१६ ला गेवराई नगरपालिकेच्या लोकार्पण सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेवराईकरांना लक्ष्मण आण्णाच्या मागणीची सरकारने दखल घेतली आहे लवकरच गेवराईतील अतिक्रमण धारकांना हाक्काचा पि.टी.आर. देणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेवराईकरांना आश्वासन दिले होते


त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स.न.२०१८ ला पंतप्रधान घरकुल योजनेचा अतिक्रमण धारकांना नियामाकुल करून अतिक्रमण धारकांना घरकुलाचा लाभ द्यावा असा शासन निर्णय काढला त्या शासननिर्णयाची अंमलबजावणी करणारी महाराष्ट्रातील एकमेव नगरपालिका ठरली आहे लक्ष्मण आण्णांनी जातीने प्रयत्न करत गेवराई शहरातील संजयनगर, संघमित्रनगर, येथील ४५० अतिक्रमण धारकांना दि.१५ ऑगस्ट २०२१ रोजी गेवराई नगरपालिकेत तत्कालीन तहसीलदार सचिन खाडे, भुमी अभिलेख विभागाचे अधिकारी पाटील तत्कालीन मुख्याधिकारी भागवत बिघोत यांनी मा.आ.लक्ष्मण आण्णांच्या उपस्थित हाक्काचा पि.टी.आर. वाटप केला होता

त्यानंतर संजयनगर येथील शासकीय जमीनीवर आरक्षण होते ते आरक्षण उठवण्यासाठी लक्ष्मण आण्णांनी २०२३-२४ नवीन डि.पी. नकाशा स्थानिक नगररचनाकार यांच्याकडून तयार करून मंजुरी साठी नगररचनाकार कार्यालय पुणे यांच्याकडे पाठवण्यात आला होता

पण २०२४ ला अपघाताने आमदार म्हणून विजयसिंह पंडीत निवडून आले होते लक्ष्मण आण्णांनी पाठवलेल्या डि.पी. नकाशा मंजुरी आली त्या अनुषंगाने पुढे पि.टी.आर संबंधी नगरपालिकेच्या मुख्याधिकारी विक्रम माडुरके यांनी एप्रिल २०२४ ला सर्व वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन काढुनी अतिक्रमण धारकांना नियामाकुल करून घेण्यासाठी आव्हान केले होते त्या अनुषंगाने शहरातील अतिक्रमण धारकांनी नगरपालिकेकडे लेखी अर्ज केले होते त्या अनुषंगाने प्रशासनाने अतिक्रमण धारकांना नियामाकुल करण्याची प्रक्रिया पूर्ण करून एका टप्प्यात फक्त संजयनगर येथील २८० अतिक्रमण धारकांना पि.टी.आर वाटप केला आहे यापलिकडे दुसरे काहीच झालेले नाही पण आ.पंडीत व त्यांचे बंधु अमरसिंह पंडित अतिक्रमण धारकांची दिशाभूल करून मतांचा जोगवा मागत



आहेत पण आपल्यासाठी लक्ष्मण आण्णांनी पि.टी.आर. देऊन घरकुल सुध्दा दिलेले आहेत व उर्वरित अतिक्रमण धारकांना हाक्काचा पि.टी.आर. व घरकुल देण्यासाठी नगराध्यक्ष सौ.गिताभाभी पवार, बाळराजे पवार, लक्ष्मण आण्णा हे सक्षम आहेत त्यामुळे अतिक्रमण धारकांबद्दल पंडितांचे बेगडी प्रेम अतिक्रमण धारकांना माहीती आहे त्यामुळे पवार कुटुंबाच्या विकासावर जनेतेचा विश्वास आहे आहे त्यामुळे येणा-या २ तारखेला गेवराई कर भाजपाच्या कमळ चिन्हावर मतांचा पाऊस पाडतील असा आम्हाला विश्वास असल्याचे शेख शब्बीर यांनी म्हटले आहे



# ज्येष्ठ नगरसेवक सुभाष सपकाळांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश !

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरात नगरपरिषद निवडणुकीच्या रणधुमाळीला आता आणखी वेग आला आहे. आज ज्येष्ठ आणि अनुभवी नगरसेवक सुभाष सपकाळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश करून बीडच्या राजकारणात नव्या समीकरणांना सुरुवात केली आहे.

सपकाळ यांनी आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, माजी आमदार सय्यद सलीम, प्रभाग क्र. १० चे उमेदवार शिवाजीराव जाधव, किशोर पिंगळे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश करून तुतारी विजयी करण्याचा संकल्प केला.


गेली तीन दशकापासून सुभाष सपकाळ हे स्व. केशरबाई क्षीरसागर, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी नगराध्यक्ष भारतभूषण क्षीरसागर, तसेच योगेश क्षीरसागर यांच्या निकट सहवासात राहून दीर्घकाळ सक्रिय राजकारणात सहभागी झाले होते. कठीण काळातही त्यांनी निष्ठा आणि बांधिलकी कायम ठेवली होती.परंतु, योगेश क्षीरसागर यांच्या आत्मस्वार्थी आणि जातीय राजकारणामुळे अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांना निवडणुकीची संधी न देता वगळण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पक्षातील अनेक जुने समर्थक असंतोषाने व्यथित झाले असून,

## प्राचार्य डॉ.शिवाजीराव घुंगरड यांच्या मायंबा ते मुंबई आत्मकथनास सर्वोत्कृष्ट तितिक्षा पुरस्कार जाहीर

मुंबई ।प्रतिनिधी

तितिक्षा भावार्थ सेवांतर्गत व तितिक्षा इंटरनॅशनल पुणे यांच्या तर्फे प्राचार्य डॉ .शिवाजीराव घुंगरड यांच्या मायंबा ते मुंबई एका प्राचार्याची संघर्षकथा या आत्मकथनास हा प्रतिष्ठेचा मानला जाणारा सर्वोत्कृष्ट पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.हा पुरस्कार दशकपूर्ती वर्धापन दिनानिमित्त रौप्य महोत्सवी (राज्यस्तरीय) तितिक्षा कलासाहित्य संमेलनात दि. ०७/१२/२०२५ रोजी सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट सर्वे नंबर ३४२ पाटील नगर, बावधन पुणे येथे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

प्रा. डॉ. शिवाजीराव घुंगरड यांचे मायंबा ते मुंबई हे आत्मकथन अल्पावधीत लोकांच्या पसंतीस उतरले असून, त्याला वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. एका खेडेगावातील तरुण शिक्षणासाठी, आर्थिक परिस्थिती व सामाजिक स्थितीचा सामना करून मुंबईसारख्या महानगरातील महाविद्यालयात प्राचार्य पदापर्यंतचा संघर्षमय व थक्क करणारा हा प्रवास, आपल्या भाषेत वास्तवतेला धरून मांडण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न या पुस्तकातून दिसून येतो.खेडेगावातील तरुणांना या पुस्तकाच्या माध्यमातून संघर्षाची प्रेरणा मिळावी हाच उद्देश डोळ्या समोर ठेवून लेखकाने हे पुस्तक लिहिले आहे.




बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र प्राचार्य डॉ. शिवाजीराव घुंगरड, ता. शिरूर(का) मधील निमगाव( मायंबा) गावचे सुपुत्र असून सध्या मुंबई येथील सेंट झेवियर्स गव्हर्मेंट पॉलीटेक्निक कॉलेजचे प्राचार्य आहेत.या त्यांच्या पुस्तकाच्या यशाबद्दल निमगाव परिसरातील हितचिंतक ,वाचक, स्नेही, नातेवाईक व आप्तेष्ट यांच्याकडून त्यांचं कौतुक होत आहे. त्यांना पुढील कार्यास दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्यावतीने हार्दिक शुभेच्छा.

# महामानव अभिवादन ग्रुपने केले १४६ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील महापुरुषांच्या ९ पुतळ्यांना दररोज पुष्पहार अर्पण करून अभिवादन करणाऱ्या महामानव अभिवादन ग्रुपने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ६ डिसेंबर या महापरिनिर्वाणदिनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करतात व सर्व सदस्य विद्यार्थ्यांना वही पेन दान करून, सर्व फुले शाहू आंबेडकर प्रेमींना वही पेन दान करण्याचे आवाहन करतात. ह्या उपक्रमाला सर्व थरातील बीड वासीय व बाहेर वास्तव करणाऱ्या कडून उत्तम प्रतिसाद मिळतो. आलेल्या दानातूनच विविध ठिकाणी वर्षभर शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम व विद्यार्थ्यांकरिता प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नगर (चांदणे वस्ती),रमाई नगर चौक वस्ती व सम्राट अशोक बुद्ध विहार बलभीम नगर पेठ बीड येथे एकूण १४६ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) वाटप करण्यात आले.

सम्राट अशोक बुद्ध विहार येथील मुख्य कार्यक्रमाच्या प्रसंगी महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले सर यांनी मुलांना शिक्षणाचे महत्त्व व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून उच्च शिक्षण घ्यावे असे समजावून सांगितले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्येष्ठ सदस्य डी.जी वानखेडे यांनी केले तर सूत्रसंचालन डी.एम राऊत यांनी केले. कार्यक्रमास से. नी एलआयसी जिल्हा



प्रबंधक यु.एस वाघमारे,से.नी मुख्याध्यापक सदाशिव निसर्गध,आर.डी चक्रे ड तेजस वडमारे यांची प्रमुख उपस्थिती होती आदर्शांचे पुष्प दीप धुपाने पूजन करून सामुदायिक त्रिसरण पंचशील घेऊन, कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेची सामुदायिक वाचन घेतले. व भारतीय लोकशाहित संविधानाचे महत्त्व मुलांना समजावून सांगितले.शिक्षणाशिवाय पर्याय नाही हा बाबासाहेबांचा बहुमोल उपदेश समाजल्या मुळे १२ वी ची विद्यार्थिनी साई ठोंबरेने आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की कितीही कष्ट पडले, अडचणी आल्यातरी उच्च शिक्षणातून [illegible] - [illegible] परीक्षेची तय्यारी करून प्रशासकीय सेवेत प्रवेश नक्कीच मिळवील असे ध्येय समोर ठेवले. तिच्या ह्या ध्येयाच्या विचारला व प्रयत्नला प्रत्येकानी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. शिक्षणात येणाऱ्या अडी अडचणी सोडवण्याकरिता महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचल फिरते मोफत वाचनालय सतत पाठीमागे राहिल असे दृढ आश्वासन दिले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ड तेजस वडमारे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास प्रेमालताताई, राधाबाई वीर, गोदावरी पटेकर, अल्काताई सुधाकर डोंगरे, राधाबाई गायकवाड, सुवर्णा वाघमारे व परिसरातील विध्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.अल्पोपहार वाटप करून सरणात्तयने कार्यक्रमाची सांगता झाली.

# विद्युत पुरवठा अभावी जल जीवन योजनचा पाणी पुरवठा बंद

## ३ गावातील लोकांवर पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ

रोहित्र बसवून पाणिपुरवठा सुरळीत करावा अन्यथा देगलूर येथील विभागीय कार्यालया समोर अमरण उपोष करण्याचा ३ गावातील सरपंचांनी दिला इशारा

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

ग्रामीण भागातील नागरिकांना घरात स्वच्छ व मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध व्हावे यासाठी केंद्र व राज्य सरकारने जल जिवन ही, योजना राबवताना दिसतायत पाणी पुरवाठ्याची नऊ महिण्यापुर्वीच कामे पुर्ण केली. पण महाराष्ट्र राज्य विधूत वितरण कंपनी मर्या. विभागीय कार्यालयाकडून त्याठिकाणी रोहित्र(डि.पी.) बसविला नसल्यामुळे मुखेड तालुक्यातील सावळी, बेन्नाळ, व सावरमाळ या तिन्ही गावातील पाणी पुरवठा बंद आहे. महाराष्ट्र राज्य विधूत वितरण कंपनी कडून २ डिसेंबर पर्यत रोहित्र(डि.पी.) बसवून पाणी पुरवठा सुरळीत करावा अन्यथा देगलूर येथील विभागीय कार्यालया समोर दि २ डिसेंबर पासून अमरण उपोष करण्याचा इशारा तिन्ही गावातील सरपंचानी प्रशासनाला इशारा दिला आहे.




मुखेड तालुक्यातील सावळी , बेन्नाळ व सावरमाळ हा भाग कायमच आवर्षण ग्रस्त असल्यामुळे पाणी टंचाईही येथील नागरिकांच्या पाचविलाच पुंजलेली असल्यामुळे येथील नागरिकांची पाणी समस्या कायमची दुर व्हावी यासाठी केंद्र व राज्य सरकारने २०२३ मध्ये जल जिवन ही,महत्त्वकांक्षी योजना राबवत सावळी येथील तलाव शेजारी तिन्ही गावातील विहीरीचे व इतर सर्व कामे मार्च २०२५ मध्ये कामे पुर्ण केले. पण देगलूर येथे कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य विधूत मंडळ या विभागीय कार्यालयाकडून आतापर्यंत फक्त विधूत पुरवठा करण्यासाठीचे खांब बसविण्यात आले आहेत. अनेकवेळा मागणी करूनही या विहिरीवर रोहित्र (डी.पी.) बसविण्यात आली नसल्यामुळे या तिन्ही गावचा पाणी पुरवठा बंद असल्यामुळे येथील नागरिकांना घागरभर पाण्यासाठी मोठी कसरत करावी आहे. नागरिकांना मुबलक प्रमाणात पाणी मिळावे यासाठी शासनाने बेन्नाळ येथ ९० लाख

सावळी, एक कोटी ४५ लाख रूपये तर सावरमाळ येथे एक कोटी ६१ लाख रूपये असे करोडो रूपये खर्ची करून याठिकाणी जल जीवन ही योजना राबविली पण महाराष्ट्र राज्य विधूत मंडळ यांच्या निष्काळजी व काम चलाऊ वृत्तीमुळेच आज सावळी , बेन्नाळ व सावरमाळ हे, तिन्ही गावे पाण्यापासून वंचित राहात असल्याचा असा आरोप प्रशासनाला दिलेल्या निवेदनात केला आहे. तर २ डिसेंबर पर्यत महाराष्ट्र राज्य विधूत मंडळ कडून रोहित्र(डी.पी) बसवून बेन्नाळ , सावळी व सावरमाळ या गावचा पाणी पुरवठा झाला नाही तर देगलूर येथील महाराष्ट्र राज्य विधूत कंपनी मर्यादित विभागीय कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा सावळी येथील माजी सरपंच श्रीकांत काळे, सरपंच श्रीमती सुनिता हाणमंत नाईक, सावळी सरपंच राहुल शिगरे, व सावरमाळ येथील सरपंच श्रीमती श्यामला गंगाधर अप्पाने, या तिन्ही गावच्या सरपंचानी निवेदनाद्वारे प्रशासना कळविले आहे.

जल जीवन योजनेची कामे पुर्ण होऊन नऊ महिने झाले. देगलूर येथील महाराष्ट्र राज्य विधूत कंपनीच्या कार्यालयात रोज जावून डि.पी बसविण्यासाठी विनंती करत आहोत. पण त्यांच्यावर याचा काहीच परिणाम दिसून येत नसल्यामुळे आज सावळी, बेन्नाळ व सावरमाळ या गावात पाणी येत नसल्यामुळे आम्हां सरपंचानाच आज अमरण उपोषण करण्याची वेळ आलेली असून हे, दुर्दैव आहे - श्रीकांत काळे,माजी सरपंच बेन्नाळ

## मन्मथ स्वामी मठदेवरू यांचे निधन

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी



मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील विरमाहेश्वर जंगम समाजातील जेष्ठ नागरिक मन्मथ स्वामी मठदेवरू ( वय ९५ )यांचे अल्पशा आजाराने पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि.२३ रविवारी ४ वाजता पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पाश्चात्य पत्नी एक मुलगी दोन मुले नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते मुक्रमाबाद येथील उद्योजक सोमनाथ स्वामी मठदेवरू यांचे काका होते.

## लोह्यात राष्ट्रवादी ओबीसी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष माजी नगराध्यक्ष कल्याणराव सुर्यवंशी यांचा

### माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपात प्रवेश

लोहा / प्रतिनिधी

लोहा शहरात नगर परिषदेच्या निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला मोठा धक्का बसला असुन राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे जीवलग मित्र ज्यांनी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांना लोह्यात पहिल्यांदा आणुन लोहा वासियांची ओळख करून दिली. आ.चिखलीकरांना पहिल्यांदा आमदार करण्यास मोठी मेहनत घेतली. तसेच २०२४ च्या विधानाच्या विधानसभा निवडणुकीत ही खंबीरपणे साथ देणारे आ. चिखलीकरांचे जीवलग मित्र व राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष कल्याणराव सुर्यवंशी यांनी दि.२२ रोजी आ. चिखलीकरांचा हात सोडून लोहा न.प. च्या निवडणुकीत पुतण्याला साथ देण्यासाठी राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टी मध्ये नांदेड येथे प्रवेश केला.यावेळी भाजपाचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ दादा पवार, माजी आ.अमर राजुरकर,, लक्ष्मीनारायण सुर्यवंशी, पिनू चुडावकर आदी उपस्थित होते.

## डॉ.अश्विनी बेद्रे यांची एसएनडीटी विद्यापीठाच्या आंतरशाखीय अभ्यास मंडळावर निवड

बीड ।प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या प्राचार्या डॉ. अश्विनी बेद्रे यांची एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या आंतरशाखीय अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून निवड झाली असून विद्यापीठाने याबाबतची अधिकृत अधिसूचना शुक्रवार दि.२१ रोजी जाहीर केली आहे.

डॉ.अश्विनी बेद्रे यांना प्राचार्या पदाचा व्यापक अनुभव असून राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी अनेक संशोधन पेपर सादर केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी फॅशन डिझाईन क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवत विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके



पटकावली आहेत. अनेक माजी विद्यार्थिनी आज विविध जबाबदारीच्या पदांवर यशस्वीरीत्या कार्यरत असून महाविद्यालयाचा गौरव वाढवत आहेत.या निवडीबद्दल तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे तसेच डॉ. प्रियांका रोडे यांनी शाल, पुष्पगुच्छ आणि प्रेरणादायी पुस्तक प्रदान करून डॉ. बेद्रे यांचा सन्मान केला.

यावेळी कर्मचाऱ्यांना संबोधित करतांना प्रा. प्रदीप रोडे म्हणाले, डॉ.अश्विनी बेद्रे यांच्या कार्याने संस्थेत नवी ऊर्जा निर्माण झाली आहे. त्यांची ही नियुक्ती म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. आपण सर्वांनी एकजुटीने, समन्वयाने आणि जबाबदारीची जाणीव ठेवून काम केले, तर संस्था आणि आपल्या विद्यार्थिनींचे भविष्य अधिक उज्ज्वल होईल.सत्कार सोहळ्या वेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी डॉ. बेद्रे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टीच्या उमेदवार करुणा बीड नगराध्यक्षाच्या निवडणुकीत करिष्मा करणार ?

बीड /प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टीच्या बीड नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ करुणा मिलिंद मस्के या पुरोगामी चेहरा घेऊन करिष्मा करण्याची शक्यता आहे.



भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टीने महाविकास आघाडी सोबत न जाता बीड नगराध्यक्ष पदासह सर्व ५२ जागेवर उमेदवार स्वबळावर उभे करून निवडणूक लढवण्याचा निर्धार काँग्रेसचे नेते माजी मंत्री अशोक पाटील, खासदार रजनीताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली केला.या निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ करुणा मिलिंद मस्के पुरोगामी चेहरा म्हणून पुढे आल्या आहेत. बीड जिल्ह्यामध्ये नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत जातीय रंग एकीकडे भरले जात असताना दुसरीकडे मात्र काँग्रेस पक्षाने सबका साथ काँग्रेस का हात हा नारा देत जातीय समीकरणाला बाजूला करून सर्व समाजाला सोबत घेऊन निवडणुकीत परिवर्तन करण्याचा नारा दिला आहे. बीड जिल्ह्यातील जातीय राजकारणाला कंटाळलेल्या मतदारांनी या निवडणुकीत जर निर्णायक भूमिका घेण्याचा निर्णय घेतला आणि ही भूमिका मतपेटीतून व्यक्त केली तर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टीच्या अधिकृत उमेदवार करुणा मस्के करिष्मा करतील अशी चर्चा आता रंगात येऊ लागले आहे.

### आंबेडकरी समाज काय भूमिका घेतो हे महत्त्वाचे ठरणार ?

बीड नगराध्यक्ष पद हे अनुसूचित जाती प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित झालेले आहे. मूळ एससी प्रवर्गातील उमेदवारांना उमेदवारी न देता या प्रवर्गातील ज्या मुलींना इतर समाजातील मुलांनी लग्न करून नेले त्यांचे धर्मांतर केले. त्यांनी आता या मुलींचा वापर आपल्या राजकीय फायद्यासाठी करून त्यांना राजकीय पक्षांच्या उमेदवाऱ्या दिल्या आहेत. या प्रवृत्तीला आंबेडकरी समाजाने एकत्रित येऊन प्रखर विरोध केला आहे.आज आंबेडकरी समाज या संदर्भात आपली निर्णायक भूमिका घेणार आहे. या बैठकीत जर आंबेडकरी समाजाने पुरोगामी चेहरा म्हणून सौ करुणा मिलिंद मस्के यांच्या पाठीशी उभा राहण्याचा निर्धार केला तर बीड नगरपालिकेचे चित्र वेगळे दिसू शकते. त्यामुळे आज होणाऱ्या आंबेडकरी समाजाच्या बैठकीकडे काँग्रेस पक्षासह सर्वांचेच लक्ष वेधले आहे.



# धाराशिव युवा नेते इरफान भाई कुरेशी यांचा राष्ट्रवादी जाहीर प्रवेश

धाराशिव ।प्रतिनिधी

धाराशिवचे युवा उत्साही व कर्तृत्ववान नेतृत्व इरफान भाई उस्मान कुरेशी यांनी अधिकृतरित्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट मध्ये जाहीर प्रवेश केला. प्रभाग क्रमांक १४ मधील त्यांच्या या प्रवेशामुळे पक्ष संघटना आणखी सक्षम, मजबूत आणि सक्रिय होणार आहे.

पक्षाच्या विचारधारे नुसार प्रभागाचा सर्वांगीण विकास, नागरिकांच्या मूलभूत सुविधा, युवकांसाठी संधी आणि सर्वसमावेशक प्रगती या कामांसाठी ते कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.लोकप्रिय जिल्हाध्यक्ष प्रतापसिंह (भैय्यासाहेब) पाटील यांच्या हस्ते इरफान भाई कुरेशी यांचा विधिवत प्रवेश संपन्न झाला.या प्रसंगी मसूद भाई शेख, विशाल शिंगाडे, शहराध्यक्ष आवेज शेख, माजी नगराध्यक्ष खलिफा भाई कुरेशी, मज्जित कुरेशी, जलील भाई कुरेशी तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीए अनंत गर्जे यांच्या पत्नीने केलेली आत्महत्या धक्कादायक अन् वेदना देणारी

## पोलिसांनी योग्य तपास करून विषयाला हाताळावे - मंत्री पंकजा मुंडे

मुंबई ।प्रतिनिधी

काल दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ६.३० ते ६.४५ वा. सुमारास माझा पीए अनंतचा फोन माझ्या दुसऱ्या पीए च्या फोनवर आला. तो खूप रडत होता. पत्नीने आत्महत्या केल्याचे अत्यंत आक्रोशाने त्याने मला सांगितले. ही गोष्ट माझ्यासाठी ही खुप धक्कादायक होती. पोलिसांच्या कुठल्याही कारवाईमध्ये कसुर राहु नये व त्यांनी योग्य तपास करुन या विषयाला हाताळावे असे माझे म्हणणे आहे. तसे मी पोलिसांना देखील सांगितले आहे.



गौरीच्या वडीलांशीही मी बोलले, ते प्रचंड दु:खात आहेत हे मी समजु शकते. अश्या घटना जीवाला चटका लावून जातात आणि मनाला सुन्न करतात. कोणाच्या अति वैयक्तिक जीवनात काय चालू असतं हे अनाकलनीय आहे.अचानक धक्कादायक अशी ही घटना घडली असल्याने मलाही अस्वस्थ वाटत आहे. असे मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या ऑफिस मधून देण्यात आलेल्या प्रतिक्रियेत म्हटलेले आहे.



## मुक्रमाबादला केंद्रप्रमुख म्हणून नागनाथ बसापुरे रुजू

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील सर्वांत मोठे केंद्र असलेले मुक्रमाबादला गेल्या अनेक वर्षीपासून केंद्र प्रमुख नसल्यामुळे येथील कार्यभार हा गोजेगाव येथील केंद्र प्रमुखावरच अवलंबून होता. मुखेडचे गटशिक्षणाधिकारी एन. जी. द्याडे यांनी मुक्रमाबाद केंद्राचा कारभार व्यवस्थित चालावा व होत असलेली शिक्षणाची दुरवस्था टाळण्यासाठी नागनाथ महादेवराव बसापुरे यांच्याकडे केंद्र प्रमुख म्हणून नव्याने पदभार दिला.

बसापुरे यांनी पदभार घेतल्यामुळे केंद्रातील शिक्षकांसह पालकांनी त्यांचे पुष्पहाराने स्वागत केले.त्यांच्या या निवडीचे विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला कामचुकार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची लागली कीड

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दोषीविरुद्ध कठोर कारवाई करावी ?

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या अकार्यक्षमतेमुळे सर्व कामे ठप्प आहेत. मात्र निधीची उपलब्धता नाही, त्यामुळे सर्व कामे थांबली आहेत अशी ओरड मोठ्या प्रमाणात केली जात आहे. यात वास्तविकता असेलही मात्र प्रामुख्याने जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील अधिकारी आणि कर्मचारी काम चुकारपणा करतात आणि अर्थपूर्ण व्यवहारातून कामांना मंजुरी दिली जाते. त्यामुळे दर्जेदार कामे होत नाहीत. ही वास्तविकता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी डोळे उघडे करून पाहण्याची वेळ आली आहे.

बीड जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंतर्गत महापुरुषाचे पुतळे, संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ते, फर्निचर, विद्युतीकरण आदी कामे निधी अभावी थांबली आहेत. पाठपुरावा नसल्याने मागणी करूनही निधी मिळालेला नाही. तर दुसरीकडे बीड जिल्हा परिषदेतील रिक्त पदांमुळे कामे होत नाहीत. अशी ओरड करण्यात येत असली तरी अधिकाऱ्याचा अकार्यक्षमपणा आणि अर्थपूर्ण व्यवहारामुळे किरकोळ कामेही होत नाहीत. बांधकाम विभागातील सर्वच कामाचा आढावा घेऊन विकास कामांना गती द्यायला हवी. अशी मागणी करण्यात आली आहे.बीड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या क्रमांक २ साठी मोमीन नावाचे कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत. खालचे अधिकारी, कर्मचारी ऐकत नाहीत. कामांना गती येत नाही, अशी त्यांची ओरड असते. ही ओरड खरी आहे का ? हे देखील तपासण्याचे वेळ आली आहे.

### किरकोळ कामे आणि दुरुस्तीही नाही

अतिवृष्टीमुळे बीड जिल्हा परिषदेच्या तळमजल्यात पाणी घुसले होते. सदर पाणी काढण्यासाठी पाच- सहा दिवस लागले. करोडो रुपयांच्या इमारीसाठी तळ मजल्यावरील पाणी खेचण्यासाठी पंप बसविण्यात आलेला नाही. यातून अधिकाऱ्याची निष्क्रियता आणि कर्तव्यशून्यता दिसून येते. खाऊगिरी वाढल्यामुळे किरकोळ कामातही काही मिळते का? हे पहिले जाते.

### कामचुकार अधिकारी कर्मचाऱ्यांना वठणीवर आणा

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या दोन्ही विभागात लक्ष घालून किमान किरकोळ कामांना गती द्यावी. कामचुकार आणि अकार्यक्षम कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वठणीवर आणावे, अशी चर्चा होत आहे.

### बांधकाम विभागातील कारभार ढेपाळला

कार्यकारी अभियंता बांधकाम नं. १ प्रमाणेच कार्यकारीअभियंत बांधकाम विभाग नं. २ विभागातील कारभार ढेपाळला आहे. आर्थिक गैरव्यवहार आणि अकार्यक्षमता यामुळे ते रजेवर गेले आहेत. कारवाईच्या भीतीपोटी ते रुजू व्हायला तयार नाहीत. या विभागातही अनियमितता वाढली आहे.

# बदामराव व बाळराजेंच्या लोकमान्य युतीमुळे गेवराई शहरात गीताभाभी पवार सर्वांना भारी !

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई नगर परिषदेच्या निवडणुकीत सर्वसामान्य जनतेला आवडलेल्या बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांच्या लोकमान्य युतीमुळे भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार सौ. गीताभाभी पवार या सर्वांना भारी ठरत असल्याचे चित्र शहरात सर्वत्र पहावयास मिळत आहे.भाजपामधील प्रवेशानंतर पंडित-पवारांचे मनोमिलन झाल्यामुळे दोन्ही नेत्यांचे कार्यकर्ते व जनतेमध्ये उत्साह संचारला असून गीताभाभींना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्यासाठी पंडित परिवारासह त्यांचे कार्यकर्ते रात्रंदिवस झटत आहेत.

गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या सन २०१४ मध्ये झालेल्या निवडणुकीच्या वेळी गेवराईचे बदामराव पंडित आणि बीडचे अमरसिंह पंडित परिवारात राजकीय युती झाल्याने या अभद्र युतीबद्दल बदामरावांच्या कार्यकर्त्यांसह जनतेमध्ये तीव्र नाराजी पसरून संतापाची लाट निर्माण झाली होती. या नाराजीचा फटका बदामराव पंडितांना बसला आणि या निवडणुकीत ते तब्बल ६० हजारांच्या प्रचंड मताधिक्याने पराभूत झाले होते. त्यामुळे बीडच्या धुर्त पंडितांनी गेवराईच्या सरळ स्वभावाच्या पंडिताला जवळ घेऊन त्यांचा राजकीय अडसर दूर केला, अशी भावना बदामराव पंडित यांच्या कार्यकर्त्यांसह जनतेत निर्माण झाली होती. गेवराईच्या पंडितांनी बीडच्या पंडितांशी केलेली अभद्र युती बदामराव पंडितांच्या कार्यकर्त्यांसह जनतेला अजिबात आवडली नव्हती. त्याची जबर किंमत बदामरावांना विधानसभेच्या निवडणुकीत मोजावी लागली होती. बीडच्या पंडितांचा हा कुटील डाव नंतर बदामरावांच्या लक्षात आला. परंतु या पराभवानेते अजिबात



खचून न जाता ते पुन्हा नवीन उभारीने कामाला लागले. सत्ता असो वा नसो बदामरावांचा जनता दरबार अखंडितपणे सुरूच असतो. त्यामुळे त्यांची लोकप्रियता आजही कायम आहे. याउलट भारतीय जनता पार्टीमध्ये झालेल्या प्रवेशामुळे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि युवानेते बाळराजे पवार यांच्यात मनोमिलन झाल्यानंतर पंडित-पवारांच्या कार्यकर्त्यांसह गेवराईकरांमध्ये उत्साह संचारला असून नगर परिषदेच्या निवडणुकीत सर्वसामान्य जनतेला आवडलेल्या पंडित-पवारांच्या या लोकमान्य युतीचे शहरासह तालुक्यात सर्वत्र स्वागत केले जात आहे. या निवडणुकीत भाजपाच्या उमेदवार सौ.गीताभाभी बाळराजे पवार यांच्या विजयासाठी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, त्यांच्या धर्मपत्नी सौ. गिरीकाभाभी पंडित, सुपुत्र बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, यशराज पंडित, पुतणे रोहित पंडित यांच्यासह संपूर्ण पंडित परिवार व त्यांचे कार्यकर्ते रात्रंदिवस झटत असल्याने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकू लागली असून त्यांना ही निवडणूक अवघड जात असल्यामुळे गीताभाभी पवार गेवराई नगरपरिषदेच्या निवडणुकीत सर्वांना भारी ठरत असल्याचे चित्र शहरात सर्वत्र पहावयास मिळत आहे.

# पत्रकार अर्जुन मुंडे यांना दि बुद्धिस्ट विकास फाउंडेशनचा राज्यस्तरीय संविधान गौरव पुरस्कार जाहीर

विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे व शहराध्यक्ष देवेंद्र तायडे यांच्या उपस्थितीत होणार पुरस्कारांचे वितरण

वडवणी। प्रतिनिधी

दैनिक राज्य लोकतंत्र वडवणी तालुका प्रतिनिधी तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई वडवणी शाखेचे सचिव पत्रकार अर्जुन मुंडे यांना ग्रामीण भागातील शेतमजुरांचे प्रश्न,त्यांचे हक्क,शासकीय योजना तसेच बांधकामगार श्रमिक,शोषित वंचित घटकांच्या प्रश्नांचा आवाज प्रखडपणे दैनिक राज्य लोकतंत्र वर्तमानपत्रातून उठवला या लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाच्या माध्यमातून त्यांचे प्रश्न शासन दरबारी पोहोचवले याच कार्याची दखल घेऊन दि बुद्धिस्ट विकास फाउंडेशन या संस्थेचे चेअरमन शिवाजीराव झोडगे यांनी प्रतिष्ठेचा समजला जाणारा राज्यस्तरीय संविधान गौरव पुरस्कार-२०२५ पत्रकार अर्जुन मुंडे यांना जाहीर केला.

हा राज्यस्तरीय संविधान गौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मित्र-परिवार,नातेवाईक,डॉक्टर, वकील,उद्योजक तसेच सामाजिक, राजकीय,शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर व पत्रकारांकडून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



७५ व्या संविधान दिनाचे अमृत महोत्सव निमित्त दि बुद्धिस्ट विकास फाउंडेशन महाराष्ट्र राज्य व बांधकामगार श्रमिक सेना यांच्या संयुक्त विद्यमाने गौरव संविधानाचा विशेष कार्यक्रमाचा आयोजन दि.३० नोव्हेंबर २०२५ रविवार रोजी ०२ ते ०६ या वेळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक,भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक पिंपरी-चिंचवड पुणे या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मा.श्री.अण्णासाहेब बनसोडे महाराष्ट्र राज्य विधानसभा उपाध्यक्ष तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.श्री.इंजि.देवेंद्र तायवाडे शहरध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड, प्रसिद्ध गायक साजन बेंद्रे ,कांचन वाघमारे या कार्यक्रमाचे संयोजक मा.श्री.शिवाजीराव झोडगे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे.

# प्रत्युष संदीप पवार या चिमुकल्याचा वाढदिवस शालेय साहित्य वाटप करून साजरा

आष्टी ।प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकी जपत आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देवीनिमगाव येथे प्रत्युष संदीप पवार याचा दुसरा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. भपकेबाज वाढदिवसाऐवजी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून हा उपक्रम राबविल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

प्रत्युष याच्या मामाच्या गावी, तिचे आजोबा व मामा यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांमध्ये वह्या, पेन, जेवणाचा डब्बा आदी आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे प्रत्युषची आई शितल वाळके यांनी याच शाळेत तब्बल सहा वर्षे शिक्षिका म्हणून ज्ञानदानाचे कार्य केले आहे. त्यामुळे ज्या शाळेने आपल्या आई घडवली, त्याच शाळेत त्याचा वाढदिवस सामाजिक भान जपत



साजरा करण्यात आल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाला भाजपा तालुकाध्यक्ष रमेश गावडे, सरपंच संदीप मार्कंडे, माजी सरपंच बिट्टू पोपळे, उपसरपंच काका ढवळे, अशोक वाळके सर, सौरभ वाळके सर, शुभम वाळके इंजिनीयर, प्रदीप वाबळे, जठार सर, सचिन मडके, विनोद वाळके, अमोल शितोळे, मनीषा रसाळ मॅडम, वैशाली घोलप, संगीता वाळके, शितल वाळके आदी मान्यवर उपस्थित होते.

या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला असून, अशा उपक्रमांनी समाजात सकारात्मक बदल घडतो, असे प्रतिपादन मान्यवरांनी केले. उपस्थितांनी प्रत्युषला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# श्रमसंहितांची ऐतिहासिक अंमलबजावणी, केंद्र सरकारचे स्वागत - श्री शांत प्रकाशजी जाटव

भारतीय जनता मजदुर संघाचा जागरूकता अभियानाचा संकल्प - भाऊसाहेब घोडके, धनंजय कुलकर्णी, चंद्रकांत पाटील

केज/प्रतिनिधी

भारत सरकारने दि.२१ नोव्हेंबर २०२५ पासून देशभरात चार श्रम संहितांची अंमलबजावणी करण्याचा घेतलेला ऐतिहासिक निर्णयाचे भारतीय जनता मजदूर संघाने (इगचड) उत्साहाने स्वागत केले आहे.भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.शांतप्रकाशजी जाटव यांनी पत्रकारांशी बोलताना केंद्र सरकारचे मन:पूर्वक आभार मानले आहेत.या चार श्रम संहितामध्ये १.वेतन संहिता २०१९, २.औद्योगिक संबंधसंहिता २०२०, ३.सामाजिक सुरक्षा संहिता २०२० आणि ४.व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कार्यपरिस्थिती संहिता २०२० यांचा समावेश आहे. शांत प्रकाश जाटव यांनी सांगितले की,या संहितां मुळे देशातील कोट्यवधी कामगारांच्या जीवन मानात वास्तविक



सुधारणा घडणार असून श्रमिक संरक्षण,पारदर्शक वेतनव्यवस्था,सामाजिक सुरक्षा आणि सुरक्षित कामकाजाचे वातावरण निर्माण होणार आहे. ऐतिहासिक आणि श्रमिक हिताचे पाऊल - श्री शांत प्रकाशजी जाटव सरकारच्या निर्णयाचे कौतुक करताना श्री. शांतप्रकाशजी जाटव म्हणाले की,चारही श्रम संहितांच्याअंमलबजावणी नंतर देशाचा संपूर्ण श्रम तंत्र अधिक आधुनिक, सुरक्षित आणि पारदर्शक बनले आहे.गिग वर्कर, प्लॅटफॉर्म वर्कर,महिला, युवक आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना पहिल्यांदाच वास्तविक सामाजिक सुरक्षा मिळू लागेल.हा निर्णय न्यायपूर्ण श्रम व्यवस्थेच्या दिशेने मोठा टप्पा आहे.

संहितांमुळे होणारे प्रमुख लाभ

देशातील सर्व कामगारां साठी किमान वेतनाची हमी,नियुक्तीपत्रअनिवार्य, पारदर्शकतेला चालना, गिग व प्लॅटफॉर्म वर्करांना प्रथमच सामाजिक सुरक्षा मिळणार आहे,महिलांना सुरक्षिततेसह रात्रीच्या पाळीत कामाची संधी, सर्व कर्मचाऱ्यांसाठी वार्षिक मोफत आरोग्य तपासणी,देशभरात एडखउ कव्हरेजचा विस्तार, वेळेवर वेतन देणे बंधन कारक असणार आहे, कंत्राटी श्रमिकांनाही समान सुरक्षा,उद्योगां साठी सिंगल रजिस्ट्रेशन आणि सिंगल लायसन्स मुळे सुलभ अनुपालन होणार आहे. भारतीय जनता मजदुर संघाचा जागरूकता अभियानाचा संकल्प

नवीन संहितांची माहिती देशातील प्रत्येककामगारा पर्यंत पोहोंचावी यासाठी भारतीय जनता मजदूर संघ देशव्यापी जनजागृती मोहीम राबवणार आहे. असे श्री.शांत प्रकाश जी जाटव यांनी सांगितले. संगठित किंवा असंघटित सर्वच क्षेत्रांतील कामगारांना त्यांच्या नवीन हक्कांची जाणीव करून देणे हा आमचा संकल्प आहे.आत्मनिर्भर भारताच्या दिशेने हे पाऊल महत्त्वाचे आहे असे त्यांनी सांगितले.केंद्र सरकारच्या या निर्णयाचे भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके, महाराष्ट्र राज्य सचिव धनंजय कुलकर्णी, मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील यांनी स्वागत केले आहे.व भारत सरकारचे आभार व्यक्त केले आहेत.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# प्रभाग ६ मधून सौ.क्रांती गोस्वामी आणि आकाश कराड यांनाच बहुमताने विजयी करा - राजकिशोर मोदी

## प्रभाग ६ मध्ये लोक विकास महाआघाडीची भव्य प्रचार रॅली ; जनतेचा वाढता पाठिंबा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकात प्रभाग ६ मधून लोक विकास महाआघाडीचे आकाश जीवनराव कराड आणि सौ.क्रांती श्रेयस गोस्वामी हेच लोक विकास महाआघाडीचे अधिकृत उमेदवार असून त्यांनाच आपले बहुमुल्य मत देऊन विजयी करावे आणि सेवेची संधी द्यावी असे आवाहन लोक विकास महाआघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांनी केले. काही अपक्ष उमेदवार राजकिशोर मोदी यांचे नांव वापरून या प्रभागात मतदारांची दिशाभूल करीत मते मागत असल्याने मोदी यांनी कालच जाहीरपणे याबाबत खुलासा केला आहे. त्यानंतर आज रविवारी लोक विकास महाआघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांच्यासह माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी घरोघरी जाऊन, मतदारांशी थेट संवाद साधत मतदानरूपी आशीर्वाद द्यावेत अशी विनंती केली. मोदींना या प्रभागात जनतेने भरभरून प्रतिसाद दिलेला दिसून आला.

निवडणूक जवळ आल्याने शहरात राजकीय घडामोडींना वेग आला असून राजकिशोर मोदी यांच्या लोक विकास महाआघाडीला संपूर्ण अंबाजोगाई शहरातून दिवसेंदिवस मोठा पाठींबा वाढत आहे. मोदी यांच्यासह आघाडीच्या सर्वच उमेदवारांची बाजू सातत्याने भक्कम होत असून लोक विकास आघाडी सत्तेत येणार हे जवळपास निश्चित आहे. प्रभाग ६ मधून लोक विकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आकाश जीवनराव कराड आणि सौ.क्रांती श्रेयस गोस्वामी यांनाही मोठा जनाधार मिळतो आहे. आतापर्यंत या दोन्ही उमेदवारांनी संपूर्ण प्रभाग पिंजून काढला असून मतदारातून दोघांच्या उमेदवारीचे उत्स्फूर्त स्वागत होत आहे. आकाश कराड यांच्या कुटुंबाचा नगरसेवक म्हणून आधीचा कामकाजाचा चांगला अनुभव या निवडणुकीत त्यांना मजबूत पार्श्वभूमी मिळवून देत आहे. तर क्रांतीताई



गोस्वामी या प्रथमच निवडणूक लढवत असल्या तरी त्यांचे पती श्रेयस ऊर्फ शैलेश गोस्वामी यांचा या प्रभागात दांडगा जनसंपर्क असल्याने त्यांच्याही उमेदवारीला जनतेकडून मोठे बळ मिळत आहे. लोकांच्या अडीअडचणीला धावून जाणारा तरूण अशी त्यांची ओळख या प्रभागात आहे. यासोबतच त्यांच्या पाठीशी राजकिशोर मोदी ठामपणे उभे असल्याने या दोन्ही उमेदवारांचे निवडणुकीतील पारडे जड आहे. परंतु, काही अपक्ष उमेदवार या ठिकाणी राजकिशोर मोदी यांचा आम्हालाच पाठींबा असल्याचे सांगून खोटा व दिशाभूल करणारा प्रचार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी, प्रभागातील मतदारांनी या अपप्रचारला बळी न पडता लोक विकास महाआघाडीचे अधिकृत उमेदवार सौ.क्रांती गोस्वामी आणि आकाश कराड यांनाच विजयी करावे असे आवाहन राजकिशोर मोदी यांनी प्रभाग क्रमांक ६ मधील मतदार बंधू-भगिनींना केले आहे. रविवारी लोक विकास महाआघाडीच्या वतीने प्रभाग क्रमांक ६ मध्ये काढलेल्या प्रचार रॅलीच्या प्रारंभी श्री संत सावता माळी यांच्या नांवे असलेल्या चौकास मान्यवरांनी अभिवादन केले. याप्रसंगी माजी आमदार पृथ्वीराज साठे, नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, सुनील वाघाळकर, जीवनराव कराड, भगवानराव ढगे, गोविंद पोतंगले, माऊली मांदळे, अतुल ढगे, बंडू भारजकर, श्री कुलकर्णी, सुमित केजकर, अमोल कुलकर्णी, श्री मुकादम, सागर दीक्षित यांच्यासह नागरिक, युवक, महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.




## मल्टी कमॉडिटी एक्सचेंज एम.सी.एक्स मार्फत शासकीय आय.टी.आय. कॉलेज भूम येथे कार्यक्रम संपन्न

भूम/प्रतिनिधी

शासकीय आय.टी.आय कॉलेज भूम येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम. सी.एक्सच्या माध्यमातून आय.टी.आयच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य श्री.के. जे.पवार सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्सचे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थितविद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना डिमॅट अकाउंट,फायनान्शियल मार्केट्स,कमोडिटीचे प्रकार,जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज,वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशनक्ट कमोडिटी व इक्विटीमध्ये असलेला फरक,तसेच सेबीच्या सारथी पचे महत्व इत्यादीचे मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा. हर्षद काळबंड सर यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन प्रा.संजीत अघाव सर यांनी केले. तसेच या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या सारणी तील घरी मुक्कामी

### जिल्ह्यात खूप दिवसांनी मतदारांना पंजा दिसतोय

स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या निवडणुकीत काँग्रेसने सर्वच ठिकाणी उमेदवार दिले असून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीत देखील काँग्रेस स्वबळावर लढणार असल्याने ग्रामीण भागात देखील आता पंजा हे चिन्ह दिसणार आहे.त्यामुळे राहुल सोनवणे यांनी जिल्ह्यात काँग्रेस सक्रीय तर केलीच व अनेक वर्षापासून जिल्ह्यात न दिसणारे पक्षाचे चिन्ह दिसल्याने काँग्रेस प्रेमी जनता पक्षाच्या भूमिकेवर आनंदी असल्याचे दिसून येत आहे.

केज/प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर रोजी केज तालुक्यातील सारणी या गावी काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या निवासस्थानी मुक्काम केला.निवडणुका दरम्यान बीड जिल्ह्यातील रणनीती याबाबत यावेळी गुजगोष्टी झाल्याचे समजते. काँग्रेसच्या सदभावना पद यात्रेने जिल्ह्यातील गढूळ वातावरण सकारात्मक तयार



करण्यासाठी सद्भावना पदयात्रा महत्त्वाची ठरली होती.ही पदयात्रा यशस्वी करण्या साठी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी मोठे परिश्रम घेतले होते. जिल्ह्यात होत असलेल्या नगरपालिका, नगरपरिषद निवडणुक प्रचार दौरा प्रदेशाध्यक्ष करत आहेत

खा.रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शना खाली काँग्रेस पक्षाची विचारधारा जिल्ह्यात पोहचवण्यासाठी राहुल सोनवणे पायात भिंगरी बांधून जिल्हाभर काम करत आहेत.सर्वत्र फिरत असताना ग्रामीण भागातील विविध प्रश्न ज्यात प्रामुख्याने लाईट, रस्ते,पाणी यांसह शेतकरी कामगार उपेक्षित वंचित यांचा आधार बनून काँग्रेस पक्ष काम करत आहे. सामाजिक सलोखा ठेवून काँग्रेसची सुरू असलेली वाटचाल यामुळे सामान्य माणूस काँग्रेसची जोडला जात आहे.जिल्ह्यात राजकारणाची समीकरणे रणनीती यावर चर्चा झाल्या.यावेळी सारणी (आ) येथे जेष्ठ नेते माजी मंत्री अशोकराव पाटील, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील,जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे,सारणी गावच्या सरपंच सौ. प्रणिता संतोष सोनवणे उपस्थित होते.यावेळी प्रदेशाध्यक्ष आदरणीय हर्षवर्धन सपकाळ यांचा सारणी ग्रामपंचायत यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## कर्मयोगी विजयकुमार जाजू व परिवाराचे नेहमीच मला समर्थन व आशीर्वाद लाभले - राजकिशोर मोदी

### लोक विकास महाघाडीच्या संपर्क कार्यालयाचे प्रभाग १ मध्ये उद्घाटन ; नागरिकांची मोठी उपस्थिती

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

कर्मयोगी विजयकुमार जाजू व जाजू परिवाराचे नेहमीच मला राजकीय समर्थन व आशीर्वाद लाभलेले आहेत. धनशक्ती विरूध्द जनशक्ती अशी ही लढाई होत आहे. खर्या अर्थाने ही निवडणुक जनतेनेच हातात घेतली आहे. लोक विकास आघाडीच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी उभ्या असलेल्या सर्वच उमेदवारांना आपले मतदानरूपी आशीर्वाद देवून विजयी करावे असे आवाहन राजकिशोर मोदी यांनी मतदारांना केले. ते प्रभाग क्रमांक १ मध्ये लोक विकास आघाडीच्या संपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये लोक विकास आघाडीच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन शनिवारी करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्ते यांना संबोधित करताना लोक विकास महाआघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी म्हणाले की,

या कॉर्नर सभेचा व्हिडिओ व फोटो पाहून विरोधकांकडून आपल्याला संपर्क साधला जाईल. प्रसंगी प्रलोभन, आमिष ही दाखवले जाईल. दबाव आणला जाईल, धमकी सुध्दा दिली जाईल. परंतु, या प्रभागातील मतदार सुजाण आहे. तो याला बळी पडणार नाही. आपले अमूल्य मत आम्हालाच देणार आहे. याची आम्हाला खात्री आहे. जाजू कुटुंबातील विशाल भैय्या, अमीत अनुप, अक्षय व परिवार माझ्यासोबत आहेत. आज कोणी सोशल मीडियावर पोस्ट टाकली. तरी विरोधकांकडून ती पोस्ट डिलीट करण्यासाठी दबाव येत आहेत. त्यामुळे लोकशाही विरोधकांनी



अस्तित्वात ठेवलेली नाही. एकाच घरात सगळी सत्ता ठेवून आपल्या सगळ्यांना गुलाम करण्याचा यांचा प्रयत्न होत आहे. आणि तो प्रयत्न गुरूवार पेठ, गांधीनगर तसेच तमाम अंबाजोगाई शहरातील सुजाण जनता हाणून पाडणार असा आम्हांला विश्वास आहे. शहरातील सर्व तरूणांनी आता निर्णय घेतलेला आहे. की, या वेळेस आपल्या लोक विकास आघाडीच्या सर्वच उमेदवारांना विजयी करायचे आहे. या प्रभागात संकेत राजकिशोर मोदी व शेख रिजवाना हाजीलाला हे नगरसेवक पदासाठी व मी नगराध्यक्षपदासाठी उभा आहे. त्यामुळे आपणांस तीन मते करायची आहेत. आपले अनमोल मत देऊन तुम्ही आम्हांला विजय करावे, मतदानरूपी आशीर्वाद द्यावीत, मी आपल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. तुमची सर्व कामे करण्याची मी हमी देतो. राज्याचे सन्माननीय उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार साहेब यांचे आशीर्वाद व पाठबळ आपल्या पाठीशी आहे. विकास निधी देण्याचे खरे काम अजितदादा दादांनी केले आहे. परंतु, येथील आमदार मात्र त्याचे स्वतः श्रेय घेत आहेत. सुज्ञ जनता हे जाणून आहे.

## शेतकऱ्यांनी महाविस्तार एआय ॲपचा वापर करावा - गोरख तरटे

आष्टी ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी विकसित करण्यात आलेल्या अत्याधुनिक महाविस्तार एआय या मोबाइल पचा शेतकऱ्यांनी व्यापक वापर करावा असे आवाहन आष्टी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी केले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित हे ॲप शेतकऱ्यांसाठी डिजिटल कृषी सहाय्यक म्हणून कार्य करणारे असून शेतीविषयक कोणताही प्रश्न शेतकरी मराठीत विचारू शकतात व त्यावर अचूक, वैज्ञानिक आणि तात्काळ सल्ला मिळणार आहे. यामधून शेतकऱ्यांना हवामानाचा रिअल - टाइम अंदाज, राज्यातील विविध बाजार समित्यांतील बाजारभाव, पिकांचे रोग - कीड निदान, तसेच पीक व्यवस्थापन, खत - पाणी व्यवस्थापन, संरक्षण उपाय याबाबत माहिती सहज उपलब्ध होते. पिकांचा फोटो अपलोड केल्यास रोग, कीड किंवा पोषणासंबंधी समस्यांचे निदान करून योग्य उपाययोजना सुचवली जाते. शासकीय योजना, विविध अनुदान, विमा यासंदर्भातील माहितीही या पमध्ये एकाच ठिकाणी मिळते. प्रगतीशील शेतकरी व कृषी विद्यापीठातील



तज्ञांशी संवादाची सुविधादेखील मधून मिळते महाविस्तार एआय हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर विनामूल्य उपलब्ध असून शेतकरी आपल्या मोबाईलमध्ये हे ॲप डाऊनलोड केल्यास घरबसल्या पिकांची संपूर्ण काळजी व व्यवस्थापनाचे मार्गदर्शन यामधून मिळू मिळणार असून शेतकऱ्यांनी या ॲपचा अवश्य वापर करावा असे आवाहन आष्टी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी केले.

## जिद्द,मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर मिळविलेले यश प्रेरणादायी - आ.सुरेश धस

आष्टी /प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांचा खडतर प्रवास, जिद्द, चिकाटी आणि मेहनत नक्कीच प्रेरणादायी आहे. विशेषतः आपल्या भागातील ऊसतोड मजूर आणि त्यांच्या पाल्याचे खरोखर कौतुक केले पाहिजे कारण कुठलीही गोष्ट साध्य करण्यासाठी एकाग्रता, निष्ठा आणि सातत्य किती महत्त्वाचे असते याचे उत्कृष्ट उदाहरण त्यांनी घालून दिले असल्याचे मत आ. सुरेश धस यांनी व्यक्त केले.

रविवारी महाराष्ट्र लोकसेवा आयोग, राज्यसेवा परीक्षेत यश संपादन करून विविध शासकीय विभागांमध्ये तसेच सुरक्षा दलांमध्ये निवड झालेल्या होतकरू विद्यार्थ्यांचा आ. सुरेश धस यांच्या हस्ते सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेले चाहूरवाडी येथील नितीन भोलाजी खेंगरे यांनी डएइउ प्रवर्गातून ५७३ गुण मिळवत राज्यात १३९ वा क्रमांक मिळवला त्यासोबतच तेजस रोहिदास भराटे यांची ग्राम महसूल अधिकारी पदी आणि शुभम बाळासाहेब माने यांची आरोग्य सेवक पदी निवड झाल्याबद्दल तर भारतीय सैन्य दलात निवड होण्याचा बहुमान मिळवलेल्या इथापे शंकर सोमीनाथ, दातीर रोहन गोरख, अमन लियाकत खान, देवकर करण विठ्ठल, गवते राहुल सुभाष, आंधळे रोहित रामकिसन, पवार ओंकार बद्रीनाथ, सारगुडे समाधान श्रीधर, कवादे सौरभ अण्णा, प्रथमेश भारत यादव, कृष्णा अनिल अंदुरे, बडे धनराज विजय, ऋषिकेश बप्पा राजपुरे, भरत महादेव शिंदे, अर्जुन विजय टोणपे, महेश दत्तात्रय काकडे, नवले प्रतीक नंदराम, सुद्रिक अभिषेक विजय, इरकर कृष्णा शिवदास, टकले सचिन गीताराम, सोनवणे सुदर्शन दादाराम, केकान वैभव आजिनाथ, ज्ञानेश्वर आत्माराम कदम, सोले आदित्य अंकुश, कोठरे माऊली



महादेव, पोकळे ओम सुनील, भोसले श्रीराज सिताराम, पावसे विवेक दिनकर, गर्जे हर्षद विठ्ठल, सागर दिनकर गर्जे, बांगर ओंकार दत्तात्रय, देविदास तुकाराम तांबे, हंबर्डे विशाल रोहिदास, शुभम भाऊसाहेब गोंदकर, राहुल कुंडलिक जगताप, सुरज राजेंद्र जगताप, कोल्हे सुरज बाळू, डीसले रोहित अशोक, संदीप शिवाजी गर्जे आणि अविष्कार छगन निकम, महेश कालिदास गरकळ, अभिषेक सुनील गरकळ या सर्वांचा अभिमानाने गौरव करण्यात आला. याशिवाय महाराष्ट्र पोलिस दलात निवड झालेल्या प्रियंका मल्हारी तांबे, घोडके दत्तात्रय गोरख व नागरगोजे किशोर शिवाजी तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलात निवड झालेल्या जाधवर चंद्रकांत बंडू, घुमरे दीपक लक्ष्मण, रायकर सिद्धांत रंगनाथ, रूपवर अशोक गवाजी आणि कुदांडे दत्तात्रय जयसिंग यांचा देखील सन्मान करण्यात आला. कष्ट, जिद्द, चिकाटी आणि सातत्याच्या जोरावर उज्ज्वल यश संपादन करून गाव, समाज व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आ. धस यांनी अभिनंदन केले.

# निवडणुकांच्या धुमाळीत सर्वसामान्य नागरीकांचे हाल

## मुलभूत प्रश्न ऐरणीवर, नेत्यांचे नागरीकांना आश्वसनांचे गाजर !

माजलगाव: राज्यात थंडीचा तडाखा वाढलेला असतानाच निवडणुकांमुळे राजकीय लोकांना मात्र उन्हाचे चटके बसताना दिसत आहेत. परंतू हेच राजकीय लोक आता लोकांच्या दारात हात जोडून येताना पहावयास मिळत आहे. राज्यातील नगरपालिकांच्या निवडणुकीचे नगारे वाजले असून बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिकांमध्ये निवडणुकीची रंगत दिवसेंदिवस वाढत आहे. उमेदवारी अर्ज दाखल, गटबाजी, पक्षांतर, जातीय राजकारण, अंतर्गत बंडाळ्या, उमेदवार ठरवणे आणि फोडाफोडी यामुळे निवडणूक तापली असली तरी या सगळ्या गदारोळात मात्र शहरवासीयांचे खरे आणि अतिमहत्त्वाचे प्रश्न धूळ खात पडल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

या निवडणुकीत कोण कोणाला भिडणार, कोणत्या घराण्यातील कोणत्या व्यक्तीला तिकीट मिळाले, कोणाची नाराजी आणि कोणाचे समीकरण बिघडले हेच प्रमुख चर्चेचे विषय ठरत आहेत. सोशल मीडिया, पक्ष कार्यालये आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत राजकीय समीकरणांचाच पाढा वाचला जात आहे. मात्र जनतेचे मूलभूत प्रश्न मात्र निवडणुकीच्या चर्चेतून गायब झाले आहेत. बीड शहरासह जिल्ह्यातील सहा नगरपालिकांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्या आजही जसाच्या तशा आहेत. शहरातील पाणीपुरवठा योजना अद्याप सुधारलेली नाही. काही भागात महिन्यातून दोन ते तीन वेळाच पाणी मिळते, तर काही भागात अजूनही टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ येते. नाल्या तुंबलेल्या, सांडपाणी रस्त्यावर वाहणारे, पाण्याच्या नळातून गढूळ पाणी येणारे असे आरोग्याला घातक चित्र कायम आहे.

स्वच्छता व्यवस्थापनाचा बोजवारा उडालेला आहे. कचरा संकलन अनियमित असून अनेक ठिकाणी कचराकुंड्या भरून उफाळत आहेत. या कचर्यामुळे दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि ऊन्हाळ्यात संसर्गजन्य रोगांचा धोका वाढतोय. काही नगरपरिषदांनी कचरावाहू गाड्या सुरु केल्या असल्या तरी व्यवस्थापनात असलेली ढिसाळपणा आणि देखरेखीचा अभाव यामुळे परिस्थिती सुधारलेली नाही.

रस्त्यांची अवस्था तर अधिकच भयावह आहे. मुख्य रस्त्यांपासून गल्लीबोळापर्यंत खड्डेच खड्डे अशी परिस्थिती असून पावसाळ्यात तर या रस्त्यांची दुरवस्था अधिकच बिकट होते. वाहतुकीचे नियोजन दुरूनही दिसत नाही. सिग्नल व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, सार्वजनिक वाहतूक यांचा अभाव असल्याने वाहतूककोंडी, अपघात आणि गोंधळ हा नागरिकांच्या रोजच्या जीवनाचा भाग बनला आहे.बीड शहरातील वाढत्या लोकसंख्येनुसार पायाभूत सुविधांची वाढ होणे अत्यावश्यक असताना, त्या दिशेने कोणत्याही नगरपालिकेने ठोस योजना किंवा धोरण पुढे आणलेले नाही. फुटपाथ व्यापणारे अतिक्रमण, अपुऱ्या स्ट्रीटलाइट्समुळे रात्री अंधारे रस्ते, सार्वजनिक उद्याने व मैदाने अतिक्रमणाच्या विळख्यात अडकून पडलेले हे देखील मोठे प्रश्न आहेत.निवडणुकीचा उत्साह, राजकीय नाराजी आणि गटबाजी याच्या वावटळीत शहराचा विकास, स्वच्छता, पाणी, आरोग्य, रस्ते, पर्यावरण, पायाभूत सुविधा आणि नागरिकांचे जगणे सुलभ करणारे प्रश्न मात्र मागे पडले आहेत.निवडणुका संपतील, नवे नेतृत्व निवडले जाईल... पण खरा प्रश्न हाच की, नागरिकांचे हे मूलभूत प्रश्न केव्हा सोडवले जातील? निवडणुका संपल्यानंतर पुन्हा पाच वर्षे आश्वासनांचेच ढोल वाजणार का? या निवडणुकीत मतदारांनी विचार करणे गरजेचे आहे की, वादळाच्या धुरळ्यात दडलेल्या शहर विकासाच्या मुद्यांना प्राधान्य देऊन आवाज उठवला नाही, तर पुढील पाच वर्षेही हेच प्रश्न कायम राहणार हे निश्चित.

# महिलांनी सामाजिक कार्यासाठी एकत्र यावे - अनिता काळे

### सृष्टी सेवा भावी संस्थेचा स्तुत्य उपक्रम सोहळ्यातून पार



आष्टी ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती चळवळीला ५० वर्षे पूर्ण झाल्याने सृष्टी बहुउद्देशीय सेवा भावी संस्थेने विविध क्षेत्रात कार्यरत महिलांना राज्यस्तरीय महाराष्ट्र समाज भूषण पुरस्कार २०२५ सन्मान सोहळा पुणे येथील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवनात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, त्यागमूर्ती रमाई आंबेडकर, माई सिंधुताई सपकाळ यांच्या प्रतिमांसमोर पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षा सौ. मिनाक्षी डोंगरे यांनी प्रमुख पाहुण्या डॉ. स्मिता बारवकर यांचे स्वागत केले. अनिता काळे, सौ. संगीता शिंदे, सुवर्णा इंगोले, मीरा पाटील, सौ. नंदा डेरे, डॉ. सुजाता कोठाळे या मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. संस्थेचे प्रस्ताविक कु. श्रेया साळवे यांनी मांडले.

डॉ. स्मिता बारवकर यांनी महिलांनी वाचन करून प्रगल्भ विचार अवलंबून सक्षम व्हावे असा आवाहन केले तर सुवर्णा इंगोले यांनी स्त्रियांना विकासाच्या समान संधी मिळणे गरजेचे असून, स्त्रियांवरील मानसिक आणि शारीरिक अत्याचारांविरुद्ध जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला. सौ. नंदा डेरे यांनी 'स्त्री ही चैतन्यशक्ती आहे, आपण स्त्रियांना लक्ष्मी मानतो असे मत मांडले. अध्यक्षीय भाषणात अनिता काळे यांनी महिलांनी आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी चांगली जीवनशैली अंगिकारली पाहिजे. महिला म्हणजे कुटुंबाचा कणा आहे. महिलांनी सामाजिक कार्य करण्यासाठी एकत्र आले पाहिजे असा संदेश दिला. या निमित्ताने विविध क्षेत्रात कार्यरत अनेक महिलांना राज्यस्तरीय महाराष्ट्र समाज भूषण पुरस्कार २०२५ देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा मिनाक्षी डोंगरे, उपाध्यक्षा माधुरी साळवे, सचिव भारती एकलारे, संचालक मंडळ सदस्य विकास डोंगरे व अनिल चाटे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री पुरंदरे व चेतना शर्मा यांनी केले. अखेरीस चेतना शर्मा यांनी उपस्थित सन्मानित पाहुणे आणि पुरस्कार विजेत्यांचे आभार मानले.

# जलजीवन मिशनच्या कामात उघड उघड भ्रष्टाचार ?

## शहागड ग्रामस्थांचा संताप उफाळला निकृष्ट कामांना तात्काळ स्थगिती व चौकशीची मागणी

शहागड प्रतिनिधी :- मौजे शहागड या अंबड तालुक्यातील मुख्य गावात सुरू असलेल्या जलजीवन मिशनच्या कामात मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जा, अंदाजपत्रकाचा भंग आणि कंत्राटदार अधिकारी संगनमताची गंभीर प्रकरणे समोर आली आहेत.

१० ते १५ हजार लोकसंख्या असलेल्या या गावाला पिण्याच्या पाण्यासाठी जलजीवन मिशन हे जीवनरेषेसारखे महत्त्वाचे काम आहे.परंतु वास्तविक काम पाहता निधीचा उघड गैरवापर मानकांचे उल्लंघन आणि निवडणुकीच्या तोंडावर घाईगडबडीत बिलं काढण्याचा उद्योग सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला आहे.निकृष्ट दर्जाच्या कामामुळे काही दिवसांतच पुन्हा पाणीटंचाईचा धोका अंबड तालुक्यातील सर्वात मोठ्या गावांपैकी एक असून शेकडो कोटींची विकास कामे वर्षानुवर्षे मंजूर झाली. परंतु प्रत्यक्षात कामांची अवस्था अत्यंत वाईट पाईपलाइन मानकांप्रमाणे नसणे खड्डे नीट न भरता माती टाकणेअंदाजपत्रकात नसलेली सामग्री वापरणे कमी किमतीच्या साहित्याने अधिक बिल काढणे यामुळे पाणीपुरवठा सुरु झाल्यानंतर काही आठवड्यांतच पाइप फुटणे,गळती, पाणीपुरवठा खंडित होणे अशी स्थिती निर्माण होणार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. कंत्राटदार अधिकारी संगनमताचा आरोप निधीचा गैरवापर उघडपणे ग्रामस्थांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी असा गंभीर आरोप केला आहे की कंत्राटदार, ग्रामसेवक काही शासकीय कर्मचारी आणि जिल्हा परिषद सदस्य एकत्र येऊन कामाच्या गुणवत्तेला तिलांजली देऊन निधीचा फायदा उचलत आहेत.लोकप्रतिनिधी आणि अधिकारी निवडणुकीच्या तोंडावर काम पूर्ण दाखवण्यासाठी घाई करत आहेत तर कंत्राटदार अंदाजपत्रकाच्या विरुद्ध बिलं काढण्याच्या तयारीत आहे ही परिस्थिती पाहून नागरिक संतप्त झाले आहेत.

हे काम सुरू राहिलं तर गाव पुन्हा पाण्यासाठी रडेल निवेदन अ‍ॅड.गणेश चंद्रकांत शिंदे युवा सेना राज्य विस्तारक महाराष्ट्र यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे शहागडमध्ये जलजीवन मिशनसारख्या अतिमहत्त्वाच्या कामात उघडपणे भ्रष्टाचार सुरू आहे.अंदाजपत्रकापेक्षा निकृष्ट दर्जाचे काम कमी गुणवत्तेचे साहित्य आणि अधिकारी कंत्राटदार संगनमतामुळे गावाचा भविष्यातील पाणीपुरवठा धोक्यात येईल.

शासनाच्या निधीची उघड लूट थांबवण्यासाठी तात्काळ कामाला स्थगिती देऊन सखोल चौकशी करा कामांना तात्काळ स्थगिती आणि सखोल चौकशीची मागणी निवेदनात पुढील ठोस मागण्यांचा समावेश आहे जलजीवन मिशनचे सुरू असलेले सर्व काम ताबडतोब स्थगित करावे कामाची तातडीने तपासणी समितीद्वारे गुणवत्ता चाचणी व्हावी अंदाजपत्रक मंजुरी आणि बिलिंग प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी दोषी अधिकारी ग्रामसेवक कंत्राटदार व लोकप्रतिनिधींवर कडक कारवाई शासनाच्या निधीचा अपव्यय थांबवून नागरिकांना योग्य दर्जाचे पाणीपुरवठा काम मिळावे गावकऱ्यांचा रोष आमच्या डोक्यावर प्रयोग करून थांबा विकास नावाखाली लूट शहागड गावात राजकीय गोटांमुळे विकासकामे सुरू असली तरी प्रत्यक्ष लाभ मात्र नागरिकांना मिळत नाही हे चित्र सर्वत्र दिसत आहे. ग्रामस्थांचा सवाल कोट्यवधींचे कामं सुरू झाली पण दर्जा कुठे? जबाबदारी कुठे ? निरीक्षण कुठे ? जिल्हा प्रशासनाकडे सर्वांचे लक्ष शहागडमध्ये सुरू असलेल्या जलजीवन मिशन कामांचे स्वरूप इतके गंभीर झाले आहे की नागरिकांनी स्पष्ट इशारा दिला आहे चौकशी न झाल्यास मोठे आंदोलन उभे राहील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे आता नागरिकांचा एकच प्रश्न शासनाच्या निधीचा गैरवापर रोखला जाणार ? की निकृष्ट दर्जाचे कामांसाठी गाव पुन्हा पाण्यावाचून त्रस्त होणार ?

# तालुक्यातील होतकरू विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ आ.सुरेश धस यांच्या हस्ते उत्साहात संपन्न

पाटोदा ।प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा परीक्षा तसेच विविध शासकीय विभाग, सुरक्षा दल आणि भारतीय सैन्यात निवड झालेल्या होतकरू विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास गावातील मान्यवर, पालकवर्ग, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि तरुणांचा मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



राज्यसेवा परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव राज्यसेवा परीक्षेत उत्तीर्ण होऊन तेजस रोहिदास भराटे यांची ग्राम महसूल अधिकारी पदासाठी आणि शुभम बाळासाहेब माने यांची आरोग्य सेवक पदासाठी निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.--- भारतीय सैन्यात निवड झालेल्या तरुणांचा मानाचा सत्कार देशसेवेची ओढ आणि निस्वार्थी योगदानाची तयारी दर्शवत खालील सत्कारमुत्ती तरुणांना भारतीय सैन्यात निवड होण्याचा मान मिळाला. इथापे शंकर सोमीनाथ, दातीर रोहन गोरख, अमन लियाकत खान, देवकर करण विठ्ठल, गवते राहुल सुभाष, आंधळे रोहित रामकिसन, पवार ओंकार बद्रीनाथ, सारगुडे समाधान श्रीधर, कवादे सौरभ अण्णा, प्रथमेश भारत यादव, कृष्णा अनिल अंदुरे, बडे धनराज विजय, ऋषिकेश बप्पा राजपुरे, भरत महादेव शिंदे, अर्जुन विजय टोणपे, महेश दत्तात्रय काकडे, नवले प्रतीक नंदराम, सुद्रिक अभिषेक विजय, इरकर कृष्णा शिवदास, टकले सचिन गीताराम, सोनवणे सुदर्शन दादाराम, केकान वैभव आजिनाथ, ज्ञानेश्वर आत्माराम कदम, सोले आदित्य अंकुश, कोठरे माऊली महादेव, पोकळे ओम सुनील, भोसले श्रीराज सिताराम, पावसे विवेक दिनकर, गर्जे हर्षद विठ्ठल, सागर दिनकर गर्जे, बांगर ओंकार दत्तात्रय, देविदास तुकाराम तांबे, हंबर्डे विशाल रोहिदास, शुभम भाऊसाहेब गोंदकर, राहुल कुंडलिक जगताप, सुरज राजेंद्र जगताप, कोल्हे सुरज बाळू, डीसले रोहित अशोक, संदीप शिवाजी गर्जे, अविष्कार छगन निकम, महेश कालिदास गरकळ, अभिषेक सुनील गरकळ या सर्व तरुणांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन सन्मान आ.धस यांनी केला




चिंचोलीमाळी, सारुकवाडी ग्राम पंचायत उपसरपंच जनजीवन योजनेचे पाणी शेतीसाठी

**वापरत असल्याची ग्रामस्थाची तक्रार, जलजीवन व गटविकास अधिकारी यांनी चौकशी करावी अशी मागणी**

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे चिंचोलीमाळीसारुकवाडी येथील उपसरपंच सौ. गीता धीरज वनवे यांनी जलजीवन मिशन पाणी पुरवठा योजनेची विहीर व पाइपलाइन स्वत:ची व नातेवाईकाची जमीन भिजवण्यास पाणी वापत असुन या प्रकरणी जलजीवन व गटविकास अधिकारी यांनी चौकशी करावी अशी मागणी समोर आली असून अशा उपसरपंचावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी तक्रार अर्जातुन करण्यात आली आहे.या विषयी सविस्तर वृत्तअसेकी,चिंचोलीमाळी ता.केज अंतर्गत सारुकवाडी गाव आहे. सदर गावास पाणी पुरवठाकरण्यासाठीजलजीवन मिशन अंतर्गत एम.आर.ई.जि.एस.च्या माध्यमातून नदीकाठी बुडीत क्षेत्रात विहीर खोदलेली आहे. त्या विहीरवरुन गीता धीरज वनवे व त्यांचे नातेवाईक जलजिवन मिशन अंतर्गत केलेल्या पाईपलाईन व्दारे त्यांच्या शेतासाठी पाणी वापरीत असुन गावातील नागरिक पाण्यासाठी ग्रामपंचायत कडे वारंवार निवेदने देत आहेत. तसेच गावातील कोणी या विहिरीची विचारणा करण्यासाठी गेले असता ते स्वत: सरपंचअसल्याचा अधिकार सांगत आहे. तरी ती विहीर सन २०१९-२०२० मध्ये झालेली असुन तेंव्हा पासुन याविहिरीवर त्यांनी अतीक्रमण केलेले आहे. तरी मे.साहेबांनी सदरील व्यक्तीवर योग्य ती कार्यवाही करुन विहीर गावक-यांसाठी खुली करुन देण्यात यावी अशी मागणी तक्रार अर्जातुन करण्यात आली आहे.गट विकास अधिकारी यावर काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

# केकतसारणी येथे श्री संत साई बाबा मंदिरात भव्य कलशारोहण व मूर्ती प्राणप्रतिष्ठा महोत्सव

## तीन दिवसीय महोत्सवाला आजपासून सुरुवात

केज/प्रतिनिधी

केकतसारणी ता.केज, जि.बीड येथे श्री संत साई बाबा मंदिरात आयोजित भव्य कलशारोहण सोहळा,मूर्ती प्राणप्रतिष्ठा व यज्ञ महोत्सवाच्या तयारीला जोरदार सुरुवात झाली असून गावात सर्वत्र धार्मिक उत्साहाची लाट उसळली आहे.भक्तिमय वातावरण,मंदिराची सजावट,दीपमाळा आणि धार्मिक पताकांच्या सजावटीने परिसर आधीच उत्सवी बनला आहे.दि.२४ नोव्हेंबर सोमवारी मिरवणुकीने सोहळ्याची सुरुवात होणार असुन सोमवार, दि.२४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता मूर्तीची भव्य मिरवणूक निघणार आहे.ढोल-ताशे, लेझीम पथक,भजनी मंडळ व साईनामाच्या गजरात निघणाऱ्या या मिरवणुकीत शेकडो भाविक सहभागी होणार आहेत.गावातून निघणाऱ्या मिरवणुकीत ग्रामस्थ व महिला तसेच युवक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

सोमवारी संध्याकाळी ९ ते ११ भावरत्न गुरुदास विविध कथा व किर्तनकार ह.भ.प.श्री समाधान महाराज शर्मा,ठाकुर रामकृष्ण परमहंस परिवार केजकर यांचे हरी किर्तन होणार आहे. त्यांनी साईबाबांच्या चरित्रावर खुप कथा केलेल्या आहेत.दि.२५ नोव्हेंबर रोजी मंगळवार रोजी सकाळी ९ वाजता ह.भ.प.श्री.कबीर महाराज आतार(राष्ट्रीय शिवशंभू व्याख्याते सातारा) यांचे भव्य कीर्तन होणार आहे.त्यांच्या कीर्तन-प्रवचनाने भक्तांना अध्यात्मिक चिंतनाचा अनोखा अनुभव मिळणार आहे.दि.२६ नोव्हेंबरला प्रमुख कार्यक्रम मूर्ती प्राण प्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा दुपारी १२ वाजुन ११ मिनीटांनी होणार आहे.बुधवार दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.श्री.महंत भगवान महाराज शास्त्री (साधू शिवराम पुरी मठ संस्थान वरपगाव) यांचे कीर्तन होणार आहे.प्राण प्रतिष्ठा विधीनंतर सर्व भाविकांसाठी महा प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

मंदिर परिसरात आकर्षक सजावट साईबाबांचा सुशोभित मंडप,पारंपरिक फुलांची आरास,तोरणांनी नटलेले प्रवेशद्वार आणि दिव्यांची सजावट यामुळे मंदिर परिसर सणा सारखा उजळून निघाला आहे. आयोजकांनी भाविकांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याची,बसण्याची व पार्किंगची उत्तम व्यवस्था केली आहे.

# दारूच्या नशेत यंत्र चालकाची महिला अभियंत्याशी हुज्जत

केज पोलिसात गून्हा नोंद

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील कानडीमाळी येथील महावितरणच्या वीज उपकेंद्राची तपासणी करण्यासाठी गेलेल्या महिला अभियंता शीतल सय्यद यांच्याशी मद्याच्या अंमलाखाली असलेल्या यंत्रचालक शंकर ठोंबरे यांनी गैरवर्तन करून त्यांच्याशी हुज्जत घातली. याप्रकरणी महावितरण च्या कनिष्ठ अभियंता शीतल सय्यद यांच्या फिर्यादी वरून यंत्रचालक शंकर ठोंबरे विरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद झाला आहे.केज येथील महावितरणच्या कनिष्ठ अभियंता शीतल वाजेद अली सय्यद या शुक्रवारी दि.१४ नोव्हेंबर रोजी रात्री पावणे दहा वाजण्याच्या दरम्यान कानडी माळी येथील महावितरणच्या विद्युत उपकेंद्राच्या तपासणीसाठी आल्या होत्या.यावेळी कर्तव्यावर असलेले यंत्रचालक शंकर ठोंबरे वय ४६ वर्षे रा.केज यांनी महिला कनिष्ठ




अभियंता शितल सय्यद यांच्या सोबत विनाकारण वाद घालून जोरजोरात आरडाओरडा केला. त्यांचा दारू पिल्याचा वास येवू लागल्यामुळे शीतल सय्यद यांनी त्यांना तुम्ही दारू पिले आहात काय ? असे विचारले असता मी दारू पिलेलो नाही असे त्यांनी सांगितले.दरम्यान वैद्यकीय तपासणी करून घेण्याबाबत सांगितले असता त्यांनी वैद्यकीय तपासणी करण्यास विरोध केला ही माहिती कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांनी त्यांचे वरिष्ठ कार्यकारी अभियंता यांना कळविली व त्यानंतर दि. १५ नोव्हेंबर रोजी शंकर ठोंबरे यांना दारुपिण्याच्या संशयावरुन वैद्यकीय तपासणी करून घेण्या संबंधीचे पत्र दिले. उपजिल्हा रुग्णालय केज येथे त्यांच्या रक्ताचे नमुने घेऊन त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असता त्याचा अहवाल गुरूवारी दि.२० नोव्हेंबर रोजी प्राप्त झाला.त्या अहवालानुसार कनिष्ठ अभियंता शीतल सय्यद यांच्या फिर्यादीवरून यंत्रचालक शंकर ठोंबरे यांच्या विरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद झाला आहे.पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार त्रिंबक सोपने हे पुढील तपास करीत आहेत.

रक्ताचे नमुने प्रयोगशाळेला पाठविले

या प्रकरणी केज येथील उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा अन्सारी यांचेशी संपर्क साधला असता शंकर ठोंबरे यांच्या रक्ताचे नमुन्याची येथे तपासणी करून छत्रपती संभाजी नगर येथील फॉरेन्सिक लॅब कडेही सदर रक्ताचे नमुने पाठविण्यात आले असल्याची माहिती त्यांनी बोलताना दिली. गोपनीयतेचा भाग असल्यामुळे या बद्दलची माहिती तुम्हाला सांगता येणार नाही.

# महाविकास आघाडीचा विचित्र खेळ, 'ये रिश्ता क्या कहलाता है'ची आठवण!

किनवट /प्रतिनिधी किनवट शहरातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये राजकीय समीकरणांचा अनोखा मेळ दिसून येत असून मतदारांमध्येही चांगलाच गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रभागात नगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्यात थेट सामना रंगणार आहे. प्रभागातील दोन जागांपैकी (७-अ) अनुसूचित जाती महिला राखीव असून (७-ब) जागा खुल्या प्रवर्गासाठी राखीव आहे.

प्रभाग ७-अ मध्ये तिघीही महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा मुकाबला

प्रभाग क्रमांक ७ (अ) या अनुसूचित जाती महिला राखीव जागेवर तिन्ही महिलांचा मुकाबला होणार आहे. विशेष म्हणजे, या तिघीही उमेदवार 'महाविकास आघाडी'तील विविध घटक पक्षांमधून आहेत.

* शिवसेना उ.बा.ठा तर्फे - *दैवशाला भालेराव

* राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) तर्फे - सलोनी स्वामी नुतपेल्लीवार

* अपक्ष - ललिताबाई मारोती मुनेश्वर

अशा प्रकारे महाविकास आघाडीतीलच तिघी उमेदवार एकमेकाच्या विरुद्ध आल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. तर भाजपा तर्फे प्रभाग क्रमांक ७ (अ) ज्योती नगराळे तर ७(ब) श्रीनिवास किशनराव नेम्मानिवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

प्रभाग ७-ब मध्ये नव्या गोंधळाची एन्ट्री!

येथे खुल्या प्रवर्गातील उमेदवार श्रीनिवास यादवराव नेम्मानिवार हे स्वतः उमेदवारी लढवत असताना प्रभाग ७-अ मधील अपक्ष उमेदवार ललिताबाई मुनेश्वर यांना सोबत घेऊन प्रचारात सक्रिय दिसत आहेत. तर आणखी एक ट्विस्ट म्हणजे या प्रभागातील भाजपाचे उमेदवार श्रीनिवास किशनराव नेम्मानिवार असून महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीनिवास यादवराव नेम्मानिवार हे आहेत तरी ये रिश्ता क्या कहलाता है मालिकेला साजेशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा शहरभर रंगली आहे. तर मतदान करताना मतदारांना आपल्या बुद्धीचा अचूक उपयोग ही करावा लागणार आहे.

सुरुवातीला आघाडी-युती नाही, पण शेवटच्या दिवशी नाट्यमय बदल

निवडणूक प्रक्रियेच्या सुरुवातीला शहरात युती-आघाडीचे कोणतेही स्पष्ट स्वरूप दिसत नव्हते. मात्र नामांकनाची शेवटची तारीख जवळ येताच गोंधळ वाढला आणि सर्व पक्षांनी वेगवेगळ्या पद्धतीने आपल्या उमेदवारी अंतिम केल्या. शेवटच्या दिवशी स्पष्ट झाले की, भाजपा, शिवसेना (उ.बा.ठा) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांची आघाडी झाली असून काँग्रेसने नगराध्यक्ष आणि १२ सदस्य असे स्वतंत्र उमेदवार देत एकला चालो रेची भूमिका घेतली आहे.

प्रभाग ५-अ मध्ये मोठा ट्विस्ट - 'तुतारी'वरून 'मशाल' आणि मग अपक्ष!

प्रभाग क्रमांक ५ (अ) मध्ये घडलेली राजकीय कलाटणी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते कपिल नाईक यांचे निकटवर्तीय चंद्रशेखर नेम्मानिवार यांनी दोन महिन्यांपूर्वी 'तुतारी' (राष्ट्रवादी शरदपवार पक्ष) कडून लढणार असल्याची घोषणा केली होती आणि त्यांनी प्रचारही सुरू केला होता.

मात्र नामांकन प्रक्रियेदरम्यान राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना उ.बा.ठा यांची आघाडी जाहीर झाली. या दरम्यान नेम्मानिवार यांना 'तुतारी'ऐवजी 'मशाल' (शिवसेना उ.बा.ठा) चिन्हावर निवडणूक लढण्यास सांगण्यात आले, आणि त्यांनी त्यास होकारही दिला.

पण अचानक ए-बी फॉर्ममध्ये बदल करत पक्षाने संजय गुरनुळे यांना अधिकृत उमेदवार म्हणून घोषित केले. परिणामी नेम्मानिवार यांना ऐनवेळी अपक्ष म्हणून मैदानात उतरावे लागले. या निर्णयामुळे नाईक कुटुंब आणि राष्ट्रवादी (शरद गट)च्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

भाजपासमोर मोठे आव्हान - 'बंडोबा' शांत कसे करणार?

भाजपकडून अनेक कार्यकर्ते उमेदवारीच्या तयारीत होते. पण ऐनवेळी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) सोबत युती झाल्याने अनेकांना उमेदवारी मिळाली नाही. आता या असंतुष्ट कार्यकर्त्यांना शांत करणे ही भाजपसमोरची मोठी परीक्षा ठरणार आहे.

प्रभाग क्रमांक ४-अ मध्ये रिपाइंची नाराजी तीव्र

प्रभाग क्रमांक ४ (अ) या अनुसूचित जाती सर्वसाधारण राखीव जागेवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ठझख)चे विवेक ओंकार यांनी नामांकन दाखल केले आहे. त्यांनी महायुतीने उमेदवारी न दिल्याचा आरोप करत निषेधाची भूमिका घेतली आहे. त्यांना शांत करण्यासाठी महायुतीचे प्रयत्न सुरू असून त्याचा निकाल काय लागतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

किनवट नगरपरिषद निवडणुकीत यंदा आघाडी, युती, तुटणे-जोडणे, नाराजी आणि नाट्यमय वळणांचे राजकीय दृश्य पाहायला मिळत आहे. प्रभाग क्रमांक ७, ५ आणि ४ मधील घडामोडींमुळे संपूर्ण शहरात चर्चांना ऊत आला असून निवडणुकीतील रंगत दिवसेंदिवस वाढत आहे.



# सब जूनियर व सीनियर राज्यस्तरीय थ्रोबॉल स्पर्धेचे थाटात उद्घाटन..

नवीन नांदेड - तालुका क्रीडा संकुल, सिडको नांदेड येथे दि २१ ते २३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या सब जूनियर व सीनियर राज्यस्तरीय थ्रोबॉल स्पर्धेचे भव्य उद्घाटन उत्साहात पार पडले. या स्पर्धेत सब जूनियर गटातील २२ संघ व सीनियर गटातील १३ संघांनी सहभाग नोंदवला असून विविध जिल्ह्यांतील खेळाडू स्पर्धेला उपस्थित झाले आहेत.

उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त जे.यु. गुपिले तर स्पर्धेच्या उद्घाटक म्हणून मनपा नांदेडच्या नगरसेविका डॉ. करुणा जमदाडे तर प्रमुख पाहुणे म्हणून जयकुमार ठेंबरे (जिल्हा क्रीडा अधिकारी नांदेड), डॉक्टर दुर्गेश रवंदे (प्राचार्य इंदिरा गांधी महाविद्यालय नांदेड), राहुल वाघमारे (महाथ्रो बॉल असोसिएशन सचिव), संतोष पांडागळे , डॉ. रमेश नांदेडकर (पर्यवेक्षक इंदिरा गांधी महाविद्यालय), बालाजी शिरसीकर (तालुका क्रीडा अधिकारी नांदेड) व डि.गा. पाटील तसेच डॉ. राहुल वाघमारे (फेन्सिंग जिल्हा सचिव नांदेड) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

# नवोदितांना संधी देणे ही काळाची गरज -डॉ. राम वाघमारे

नांदेड :- दि २३ नोव्हेंबर वाचन संस्कृती कमी होत चाललेल्या या काळात नवोदित साहित्यिकांना योग्य मंच मिळणे अत्यंत आवश्यक आहे. ग्रामीण भागात दर्जेदार साहित्यनिर्मिती घडावी आणि नवीन लेखक तयार व्हावेत यासाठी सप्तरंग बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि सप्तरंगी साहित्य महिला मंडळ करत असलेले उपक्रम स्तुत्य आहेत,असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. राम वाघमारे यांनी केले.



नांदेड येथील विसावा हॉटेलमध्ये आज सप्तरंग संस्थेच्या वतीने जागतिक पुरुष दिनानिमित्त आयोजित विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार समारंभ व कवी संमेलन घेण्यात आले, त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य प्रल्हाद इंगोले होते.

पुढे ते म्हणाले, गेल्या पाच वर्षांत सप्तरंग संस्थेने ग्रामीण साहित्य संमेलन, कवी संमेलन तसेच विविध साहित्यिक उपक्रमांद्वारे नवोदितांना मंच उपलब्ध करून दिला आहे. या मंचातून अनेक नवे साहित्यिक पुढे येत असल्याचे वाघमारे म्हणाले.

पुरुषांचा आत्मसन्मान वृद्धिंगत करण्यासाठी महिला मंडळाने घेतलेल्या पुढाकाराचे त्यांनी विशेष कौतुक केले. जागतिक पुरुष दिनानिमित्त संस्थेने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा केलेला गौरव ही सामाजिक सकारात्मकतेची खूण आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमात पोलीस हेड कॉन्स्टेबल रवी लोहाळे, प्रा. संजय नरवाडे, अनुरत्न वाघमारे, अभियंता लक्ष्मण लिंगापुरे यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी झालेल्या कवी संमेलनात अनेक कवींनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदवत आपल्या रचना सादर केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रणजीत गोणारकर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. भीमराव दिपके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अनुरत्न वाघमारे, नागोराव डोंगरे, रूपाली वागरे, अंजली हिंगोली, सावित्री शेवाळकर, ज्योती परांजपे, प्रतिभा पांडे आदींनी परिश्रम घेतले.

# शासकीय आदिवासी आश्रमशाळांतील शिक्षक-कर्मचारी मुख्यालयी राहणे गरजेचे सहायक जिल्हाधिकारी जेनिथ चंद्रा यांचे आदेश पारित...

नियमभंग करणाऱ्यावर कारवाईची सूचना

तामसा /प्रतिनिधी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट अंतर्गत सर्व शासकीय आणि निम शासकीय आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक असल्याचे कडक निर्देश प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी जेनिथ चंद्रा (भा.प्र.से.) यांनी दिले आहेत. शासनाचे ठोस आदेश असूनही अनेक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हे जिल्ह्याच्या किंवा आपल्या सोयीच्या ठिकाणावरून नेहमीच अपडाऊन करत आहेत त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम पडत आहे. याच बाबीमुळे प्रकल्प कार्यालय अंतर्गत येणाऱ्या आश्रम शाळेत विद्यार्थ्यांसंबंधी अनेक प्रकरणे घडली गेली पण यावर पूर्णतः बदल झालेला दिसून आला नाही. आदिवासी विकास विभागाने शासन परिपत्रक क्र. शाशाआ- २०१५/प्र. क्र. २७८/का. १३ दि. २४ ऑगस्ट २०२१ तसेच कार्यालयीन पत्राव्दारे याबाबत आधीपासूनच स्पष्ट नियम लागू आहेत. मात्र वास्तविक पाहता हे सर्व कर्मचारी या आदेशास केराची टोपली दाखवत अनेक शिक्षक व कर्मचारी मुख्यालयी न राहत असल्याचे आढळून आले आहे. वारंवार शासनाने या प्रकरणी आदेश जारी केले आहेत परंतु त्या कडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. या पूर्वी पण प्रकल्प कार्यालयानेच प्रकारचे आदेश काढले होते होते पण त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी मात्र झाली नसल्याचे सिद्ध झाले आहे मग दर तीन महिने आणि सहामाही तपासनीस जाणारे प्रकल्प कार्यालयाचे त्या त्या शाळेचे पालक अधिकारी कोणती तपासणी करतात....? हे पाहणे तितकेच गरजेचे असल्याचेही मत तक्रारकर्ते यांनी केले आहे.

मुख्यालय न सोडणे बंधनकारक - आश्रमशाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी मुख्यालयीच राहणे आवश्यक. हे शासनाचे धोरण असून कोणत्याही परिस्थितीत त्याचे पालन करणे अनिवार्य आहे नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. मुख्यालय सोडणाऱ्यांची माहिती संबंधित मुख्याध्यापक यांनी त्वरित प्रकल्प कार्यालयास देण्याचे आदेश आहेत. या बाबत ऑर्गनायझेशन फॉर राइट्स ऑफ ट्रायबल्स चे डॉ.डी.डी.गायकवाड,पालक समन्वय समितीचे शंकर मेंडके, ज्ञानेश्वर भडंगे ,संतोष डवरे,पंडित साबळे, बाळू गवले,रामदास डोखळे, डॉ.माधव भुरके, संजय वाळके, ,आदींनी पाठपुरावा केला आहे. यावेळी अनेकवेळा या प्रकरणी आदेश जारी करण्यात आले पण ते कुठे गेले हे मात्र निश्चित समजू शकले यावेळी तरी काही फरक पडेल का.... हे पाहणे तितकेच गरजेचे असल्याचेही मत श्री शंकर मेंडके डवरे यांनी यांनी व्यक्त केले आहे.

# तालुका पुरवठा विभागातील महिला नायब तहसीलदार 'एसीबी' च्या जाळ्यात..

तामसा परिसरातील वारकवाडी येथील राशन दुकानदार काडून लाच स्वीकार..

तामसा /प्रतिनिधी

हदगांव येथील तहसील कार्यालयात पुरवठा विभागात कार्यरत असलेली लाचखोर नायबतहसीलदार सुमन संभाजी कऱ्हाळे त्यांच्यासाठी लाचेची रक्कम स्वीकारणारा कंत्राटी डेटा ऑपरेटर गोविंद आप्पाराव जाधव हे दोघे २२ नोव्हेंबर रोजी सापळ्यात अडकले आहेत.

वारकवाडी येथील राशन दुकानदाराकडे १० टक्के मागण्यावरून सदरील प्रकार समोर आला. दरम्यान पुरवठा विभागांतर्गत पुरविल्या जाणाऱ्या राशन कार्डची केवायसी करणे, नवीन नावे समाविष्ट करणे यासह विविध कारणांसाठी नागरिकांची आर्थिक पिळवणूक केली जात होती. भरीस भर हदगाव तहसील कार्यालयात पैसे घेताना रंगेहाथ पकडले राशन दुकानाच्या नफ्यातील १० टक्के रक्कम दरमहा आणून देण्याची उघड मागणी नायब तहसीलदार सुमन कऱ्हाळे यांनी केली होती. दरम्यान, दुकानदाराने नांदेड 'एसीबी'त संपर्क साधून रितसर तक्रार दिल्यावर २२ नोव्हेंबर रोजी दुपारी सापळा रचला. यावेळी ५ हजार ७०० रुपयांची लाच कऱ्हाळे यांनी मध्यस्थामार्फत म्हणून राशन दुकानदाराच्या नफ्याची लाचखोरीची प्रवृत्ती थांबणार कशी?भागीदार व्हायला निघालेली नायब तहसीलदार सुमन कऱ्हाळे व तीच्यासाठी लाच स्वीकारणारा डेटा ऑपरेटर कंत्राटी गोविंद जाधव यांना रंगेहात पकडले ,चोकट... लाचखोर प्रवती कधी थांबणार..हदगांव कृषी विभागातील एका अधिकारी ला दोन महिन्यापूर्वी मनाठा येथील शेतकऱ्याकडून लाच स्वीकार हदगाव पंचायत समितीतही लाचखोरीचे प्रकरण उघडकीस आले होते. त्यापाठोपाठ हदगाव तहसील पुरवठा विभागातील नायब तहसीलदार व ऑपरेटर लाचेच्या जाळ्यात अडकले आहेत.सदर कंत्राटी राशनकार्ड नावं जोडणी, कमी करणे, राशन दुकानदार काडून मोहमाया जमा करणे हे या कार्यासाठी मुख्यत लिप्त होता.हदगांव तहसील कार्यालय, पंचायत समिती च्या वसुली चा कारभार कंत्राटी कर्मचाऱ्यांना जातो हे आज उघडकीस आलं.. पंचायत समिती त कंत्राटी कर्मचाऱ्याकडून पंतप्रधान आवास योजनेचा देवाणघेवाण उघडकीस आहे पण सर्वसामान्य लाभार्थी समोर येत नाही..

## मालेगाव येथील अत्याचार चिमुकलीला सिडको हडको सराफा असोसिएशनच्या वतीने श्रद्धांजली

नांदेड - नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील मौजे डोंगराळे येथे नराधमाणे केलेल्या अत्याचारा विरुध्द सिडको हडको सराफा असोसिएशन व माजी नगरसेवक, राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांच्या वतीने सिडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात मेणबत्ती पेटवून स्व .यज्ञा दुसाने हिस श्रद्धांजली अर्पण करण्यात येऊन अत्याचार करणाऱ्या आरोपीस कडक शासन करण्याची मागणी करण्यात आली. दि २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक सिडको येथे स्व.यज्ञा दुसाने हिस श्रद्धांजली अर्पण करण्यात आली ,यावेळी शिवसेना, भाजपा, सराफा असोसिएशनचे यांच्या सह सिडको हडको परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती .

## 'जि. प'.च्या वरिष्ठ लिपिक विमलबाई भुरे यांचे निधन

नांदेड: नांदेड जि. प.च्या वरिष्ठ लिपिक विमलबाई मदनराव भुरे थडीसावळीकर (वय-५६ वर्षे, रा. हडको, नांदेड) यांचे प्रकृती अस्वास्थ्यामुळे २२ नोव्हेंबर रोजी रात्री



निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर रविवारी २३ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजता नांदेडच्या 'सिडको' परिसरातील 'वैकुंठधाम' स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते कामेश भुरे, नितीन भुरे तसेच चेतन भुरे थडीसावळीकर यांच्या 'त्या' मातोश्री होत.

# शासनाने शेतकऱ्यांना दिलेले अतिवृष्टीचे अनुदान बँकेने कर्ज खात्यात जमा करू नये - प्रा.बबनराव आंधळे

बीड /प्रतिनिधी

शासनाने शेतकऱ्यांना दिलेले अतिवृष्टीचेअनुदान बँकांनी कर्ज खात्यात जमा करू नये अशी मागणी बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी शासनाकडे केली आहे पुढे जून ते सप्टेंबर दरम्यान संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये प्रचंड प्रमाणात अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असल्यामुळे शासनाने त्यांची दखल घेऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रत्येकी दहा हजार रुपये जमा केले आहेत त्यामुळे शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळाला पण अनेक बँकांनी शासनाने शेतकऱ्यांना दिलेल्या



अनुदानाचे शेतकऱ्याचे बँक खाते बँका होल्ड करीत असून शासनाने शेतकऱ्यांना दिलेले अनुदान हे कर्ज खात्यात जमा करत आहेत त्यामुळे शेतकरी प्रचंड आर्थिक अडचणीत सापडला आहे अतिवृष्टीने झालेले नुकसान प्रचंड आहे मदतीचा हात म्हणून शासन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करत आहे पण बँकांनी या अनुदाना वर डोळा ठेवून ते कर्ज खात्यात जमा केल्यास शेतकऱ्यावर मोठ्या प्रमाणावर अन्याय होणार आहे.तेव्हा याकडे तात्काळ शासनाने व जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन शासनाने शेतकऱ्यांना दिलेले अतिवृष्टीचे अनुदान बँक कर्ज खात्यात जमा करू नये अशी मागणी

# साबला येथे जलपूजन कार्यक्रम संपन्न,सरपंच जनाबाई नरहरी काकडे, एआरटी संस्था,यवतमाळ ॲक्सिस बँक यांच्या वतीने जलपूजन कार्यक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी

सरपंच जनाबाई नरहरी काकडे व समस्त साबला येथील नागरिकांच्या विनंतीला मान देऊन एआरटी संस्था,यवतमाळ संस्थापक अध्यक्ष सुहास धस,मन्सुर खोरासी,जल संधारण तज्ञ पवन नखाते, प्रकल्प व्यवस्थापक वली तांबोळी,प्रकल्प सहाय्यक ज्योतीताई सांबरे,प्रकल्प सहाय्यक प्रदिप दहिरे, पोकलेन ऑपरेटर सोनुकुमार चंद्रवंशी, दिलीपकुमार चंद्रवंशी तसेच अँक्सिस बँक प्रतिनिधी यांच्या वतीने साबला येथील नदी पात्राचे दोन हजार मीटर खोलीकरण व रुंदीकरण करुन त्यामध्ये वीस वीस मीटर अंतराचे बॉक्स म्हणजे शोष खड्डे करुन त्यामध्ये प्रत्येक खड्यात वीस फूट खोल बोअरवेल घेण्यात आले आहेत. त्यामध्ये पावसाचे पडलेले पाणी दुसरीकडे इतर ठिकाणी वाहून न जाता त्याच ठिकाणी जमिनी मध्ये मुरले पाहिजे अशा प्रकारचे काम करण्यात आलेले आहे तसेच या वर्षी मे महिण्यात अवकाळी पाऊस पडला आणि साबलाशिवारातील व परिसरातील बोअरवेल तसेच विहिरींनाही याचा चांगला फायदा झाला. जवळ पास एक ते दिड किलो मीटर अंतरावरील



बोअरवेल व विहिरींना याचा भरपूर फायदा झाला.या अगोदरच्या काळात म्हणजे अंदाजे वीस बावीस वर्षापासून साबला या गावातील नागरिकांना पाण्याची भिषण टंचाई जाणवत होती.साबला येथील सरपंच जनाबाई नरहरी काकडे व साबला येथील सर्व नागरिकांच्या विनंतीला मान देऊन एआरटी संस्था,यवतमाळ व क्सिस बँक यांच्या माध्यमातुन साबला येथील नागरिकांचा तसेच पशु पक्षी यांच्यापिण्याच्या पाण्याचा भेडसावणारा प्रश्न कमी प्रमाणात झाला आहे.यावर्षी पाऊसही चांगल्या प्रकारे पडला असल्यामुळे साबला शिवारात पडलेल्या पावसाचे पाणी हे साबला शिवारात आडवल्यामुळे साबला येथीलनागरिकांना पाण्याची टंचाई भासणार नाही.यामुळे साबला गावातील सर्व नागरिक आनंदी झालेले आहेत.

सरपंच जनाबाई नरहरी काकडे ,एआरटी संस्था, यवतमाळ व अँक्सिस बँक प्रतिनिधी,ग्राम पंचायत अधिकारी तानाजी शिंपले यांचे सर्व गावकरी यांनी आभार मानले आहेत. यावेळी माजी सरपंच मधुकर काकडे,चेअरमन उत्तम काकडे,ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,समाजसेवक नरहरी काकडे,रामराजे शिंदे,दशरथ कटारे,माजी पोलिस उप निरीक्षक उमाशंकर शिंदे, मुख्याध्यापक हनुमंत कटारे,जगन्नाथ काकडे, लक्ष्मण महराज काकडे, गणेश कटारे,रंगनाथ नाईकनवरे,उध्दव नाईकनवरे,बाबुराव कटारे गुलाब मुळे,माऊली नाईकनवरे,राहुल मुळे, लखन राऊत,अंकुश मुळे, भैरू नखाते,सुर्यभान सरवदे,अशोक रोकडे, संदिपान सरवदे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत जलपूजन कार्यक्रम संपन्न झाला.